मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive



**वडगावात पोटोबा महाराजांच्या दर्शनाला लाखो भाविकांची गर्दी**

वृत्त पान ३ वर...

RNI Regd. No. 72105/99 ⁂ वर्ष २५ ⁂ अंक २२७ ⁂ सातारा ⁂ गुरुवार, दि. २५ एप्रिल २०२४ ⁂ पाने ६ (सुप्रभात) ⁂ किंमत ५/– रूपये

# देशात हुकूमशाहीची सत्ता

## शरद पवारांचा मोदींवर हल्लाबोल



**टेंभुर्णी / प्रतिनिधी**

**दिल्लीमध्ये मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शिक्षण, स्वच्छता, आरोग्य यासह अनेक चांगली कामे केली आहेत. त्यांना केंद्र सरकार निधी देत नाही, असा आरोप शरद पवार यांनी केला आहे. तसेच झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनीही आदिवासी प्रश्नावर केंद्र सरकार विरोधात आवाज उठवला म्हणून दोघा मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकले असून ज्याप्रकारे आवाज उठवणाऱ्यांना इंग्रज हुकूमशाही पद्धतीने तुरुंगात टाकत होते, तशाच पद्धतीने सरकारच्या विरोधात आवाज उठवणारांना मोदी सरकार तुरुंगात टाकून हुकूमशाहीने वागत आहे, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी हल्लाबोल केला. महागाई, बेरोजगारी, गॅस व पेट्रोल-डिझेल दरवाढ केल्याने सर्वसामान्यांना जगणे मुश्कील झाले असल्याचेही ते म्हणाले.**

माढा लोकसभा मतदारसंघामध्ये मोडनिंबमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशीलमोहिते-पाटील यांच्या प्रचारानिमित्त आयोजित केलेल्या जाहीर सभेत पवार बोलत होते. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

पुढे बोलताना पवार म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी महागाई, बेरोजगारी करून गॅस, पेट्रोल-डिझेल दरवाढ केल्याचा आरोप करून यापूर्वी मोदींनी मी सत्तेत आलो तर ५० दिवसात पेट्रोल-डिझेलचे व गॅसचे दर निम्म्या किमतीवर आणून महागाई कमी करण्याचे आश्वासन दिले होते; परंतु आज ७० रुपयांचे पेट्रोल १०६ रुपये झाले तर ४१० रुपयांचा गॅस ११६० रुपयांना मिळत असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. त्यांचे जगणे मुश्किल झाले आहे. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदीवर आता जनता विश्वास ठेवणार नाही.

> “ मागील वेळी मी आणि मोहिते–पाटील यांनी खासदार रणजितसिंह नाईक–निंबाळकर यांना निवडून देत मोठी चूक केली, तर आमदार सातपुतेच्या रूपाने बीडचे पार्सल माळशिरस तालुक्यात ठेवलं. आता ही चूक टाळण्यासाठी व माढा पवारसाहेबांच्या पायाशी आणण्यासाठी मी विमानातून उडी ठोकून रिक्षाने पवार साहेबांकडे आलो असून मी आणि मोहिते–पाटील एकत्र आल्याने महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते–पाटील मोठ्या फरकाने विजयी होतील.
>
> – उत्तमराव जानकर

**माढ्यातील सर्व समस्या सोडवणार : धैर्यशील मोहिते-पाटील**

**महाविकास आघाडीचे व राष्ट्रवादीचे उमेदवार धैर्यशील मोहिते–पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळाला पाहिजे, कुर्डूवाडीतील उड्डाणपुलाचा प्रश्न, रेल्वे वर्कशॉपचा प्रश्न, कुर्डूसह १३ गावांचा सिंचनाचा प्रश्न व माढा तालुक्यात उच्चशिक्षण मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहे.**

२०१४ साली बेकारी कमी करून युवकांना सक्षम बनवण्याचे आश्वासन मोदींनी दिले होते; परंतु एका जागतिक संघटनेच्या अहवालानुसार भारतामध्ये १०० पैकी ८७ तरुण विनानोकरीचे असल्याचे सिद्ध झाल्याने मोदींनी बेरोजगारी कमी करण्यासाठी काहीही प्रयत्न केला नाही, असाही आरोपही पवारांनी केला.

नोटबंदीच्या काळात अनेक नागरिक बँकेच्या दारात उभे होते. यामध्ये महाराष्ट्रात ७०० लोक मृत्यूमुखी पडले. हा देश जेवढा हिंदूंचा आहे, तेवढाच ख्रिश्चनांचा, शिखांचा, इसाईंचा, मुस्लिमांचा व सर्वधर्मीयांचा आहे. हा देश शक्तीशाली बनवण्याची गरज असल्याचे पवारांनी सांगितले.

या देशामध्ये पंतप्रधान म्हणून पंडित नेहरू, मनमोहन सिंग, (पान ५ वर)

# कोल्हापुरात शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींची अतिविराट सभा

## दोन लाखांवर लोक जमतील; पालकमंत्री हसन मुश्रीफ यांचा विश्वास संजय मंडलिक व धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ तपोवनवर सभा



**कोल्हापूर :** महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक व धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा होणार आहे. शनिवारी (ता. २७) सायंकाळी चार वाजता तपोवन मैदानावर होणारी ही सभा अतिविराट होईल. असा विश्वास पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला. या सभेला दोन लाखावर गर्दी होईल, असेही ते म्हणाले.

या सभेच्या नियोजनासाठी कोल्हापुरात हॉटेल पॅव्हेलियनमध्ये भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस -अजित पवार गट, शिवसेना- एकनाथ शिंदे गट आणि मित्र पक्षांच्या प्रमुख नेतेमंडळींची बैठक आयोजित केली होती. या बैठकीनंतर मंत्री श्री. मुश्रीफ यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली.

यावेळी श्री. मुश्रीफ म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसनशील भारत ही ओळख पुसून विकसित भारत हा नवा लौकिक निर्माण केला आहे. गेल्या दहा वर्षात त्यांनी देशाच्या सर्वांगीण विकासाचे आणि भारतवासीयांना कल्याणकारी योजना देण्याचे मोठे कार्य केले आहे. जिल्ह्यातील कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार प्रा. संजय मंडलिक व हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील माने या दोन्हीही जागा मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. असेही ते म्हणाले.

स्वागत व प्रास्ताविकात खासदार धनंजय महाडिक म्हणाले, कोल्हापुरात होत असलेली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा ऐतिहासिक होईल. महायुतीतील सर्वच नेतेमंडळी व कार्यकर्त्यांनी ही अतिविराट सभा यशस्वी करायचा निर्धार केला आहे. त्यासाठी महायुतीमधील सर्वच घटकांनी समन्वयाने नियोजन करून प्रत्येक तालुकानिहाय या सभेचे नियोजन करावे.

यावेळी राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी मंत्री सदाभाऊ खोत, खासदार धनंजय महाडिक, कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार प्रा. संजय मंडलिक, हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आंबिटकर, समरजीतसिंह घाटगे, माजी आमदार के. पी. पाटील, माजी आमदार चंद्रदीप नरके, माजी आमदार अमल महाडिक, प्रा. जयंत पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र माने, भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजवर्धन निंबाळकर व धैर्यशील देसाई, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष उत्तम कांबळे, गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष अरुणराव डोंगळे, सम्राट महाडिक, भूषण पाटील, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष आदिल फरास, भाजपचे महानगर विजय जाधव, शिवसेना शहराध्यक्ष सुजित चव्हाण, (पान ५ वर)

## थोडक्यात

### आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी पाचजणांवर गुन्हा

**सातारा :** न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी पाचजणांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पिरवाडी येथील न्यू गुलमोहर सहकारी गृहनिर्माण संस्थामधील फ्लॅट नंबर ४७ ही मिळकत न्यायालयाच्या आदेशानुसार सील केली आहे. तरीही आदेशाचे उल्लंघन करत साजीद अल्हामद शेख, अल्हामद नुरुल हसन शेख, राशिद अल्हामद शेख, गाजीया शेख, नाजिया शेख (सर्व रा. सातारा) यांनी मिळकतीचे सील केलेले कुलूप तोडून अनधिकृतपणे प्रवेश केला. ही घटना दि. २२ एप्रिल रोजी दुपारी घडली असून फायनान्स कंपनीच्यावतीने प्रकाश तानाजी बाबर यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

### वेगवेगळ्या घटनांमध्ये दोनजणी बेपत्ता

**सातारा :** वेगवेगळ्या घटनांमध्ये सातारा शहरासह तालुक्यातील दोनजणी बेपत्ता झाल्याच्या नोंदी संबंधित शाहूपुरी पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आल्या आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, गडकर आळी येथील राहत्या घरातून सौ. सोनाली सुरज गवळी (वय २७) या दि. २१ एप्रिल रोजी सकाळी बेपत्ता झाल्या आहेत. या प्रकरणी पतीने शाहूपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलीस हवालदार डमकले तपास करत आहेत.

याबाबत कोणाला माहिती मिळाल्यास पोलिसांना संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दुसऱ्या घटनेत सातारा तालुक्यातून २० वर्षीय युवती बेपत्ता झाली आहे.

याबाबत तालुका पोलीस ठाण्यात नोंद झाली असून ही घटना २० एप्रिल रोजी घडली आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# निवडणूक आयोगाचा गळा भाजपच्या हाती

## माणिकराव ठाकरे यांची टीका



**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सर्वांना न्याय मिळावा, निवडणुक प्रक्रीया निपक्षपातीपणे व्हावी, यासाठी निवडणुक आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र, आज निवडणुक आयोगाचा गळा भाजप व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या हातात ठेवला आहे. त्यामुळे निवडणुक आयोगाकडून निपक्षपातीपणे कामकाज होईल, याची शास्वती नाही. संविधानिक संस्था निस्तनाबुथ करण्याचे काम भाजपकडून केले जात आहे, अशी टीका अखील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रभारी माणिकराव ठाकरे यांनी केली.

पुणे लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी व इंडिया आघाडी काँग्रेसचे उमेदवार आ. रविंद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ काँग्रेस भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार (पान ५ वर)

**शिंदे - पवारांनी पायावर दगड मारून घेतला**

**अजित पवार पूर्वी राज्यातील निवडणुकीच्या जागा ठरवत असत, पवार साहेब कधीही त्यात हस्तक्षेप करत नव्हते. आज अजित पवारांची आवस्था काय आहे, ऐवढे मिंधे होण्याची गरज काय, भाजपने त्यांना घरातलाच उमेदवार देण्यास भाग पाडले. उद्धव ठाकरे यांनी शिंदेंना काय नाही दिले. सर्व निर्णय शिंदे घेत होते. त्यावेळी या दोघांना जी उंची होती ती आज राहिली नाही. या दोघांनी भाजप सोबत जाऊन स्वत:च्या पायावर दगड मारून घेतला आहे.**

# संजयकाकांच्या समोर नाराजीचा ‘अंडर करंट’

## ● पक्षश्रेष्ठींची डोकेदुखी; मोदींसाठी मतदान करण्याची मागणी



**सांगली/प्रतिनिधी**

सांगली लोकसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार संजयकाका पाटील यांना उमेदवारी देण्यावरून पक्षात मतभेद होते, मात्र असे असताना काकांनी थेट अमित शहा यांच्याकडून देशातील पहिल्या यादीत स्वतःची उमेदवारी खेचून आणली, मात्र आता त्यांच्यापुढे गेल्या दहा वर्षात या ना त्या कारणाने नाराज झालेल्या नेत्यांचा अंडरकरंट थांबवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

भाजपमध्ये एकदा उमेदवारी दिली की पक्ष सांगेल ती पूर्व दिशा, अशी परंपरा राहिलेली आहे. मात्र, अलीकडे पक्षात मोठ्या प्रमाणात आयात झालेली असल्याने काँग्रेसयुक्त भाजप झालेला आहे, त्यामुळेच भाजपमध्ये सुद्धा आता बंडाची भाषा बोलली जाऊ लागली आहे. संजयकाका हे आक्रमक नेते म्हणून त्यांची ओळख आहे, याच आक्रमकतेतून त्यांनी प्रत्येक विधानसभा मतदार संघात स्वतः चा वावर ठेवला आहे, मात्र हाच वावर आता त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरू लागला आहे.

विलासराव (पान ५ वर)

**जतमधून बंडाची सुरूवात**

**जत तालुक्यात काकांच्या विरोधात उघड भूमिका सर्व प्रथम दुष्काळी फोरममध्ये प्रमुख असणारे माजी आमदार विलासराव जगताप यांनी भूमिका घेतली, भाजपचा राजीनामा देऊन त्यांनी काकांना विरोध करीत विशाल पाटील यांना पाठींबा जाहीर केला. त्यामुळे एकीकडे ज्या विक्रम सावंत यांच्यासाठी काकांचे वैर आले, ते विक्रम सावंत राजकीय घडामोडींमुळे आता काकांना मदत करू शकणार नाहीत, तर दुसरीकडे काकांनी स्वत:चा गट उभा केला म्हणून जगताप गट नाराज आहे.**

# गंभीर गुन्हे करणाऱ्या चौघांच्या टोळीला तडीपारीचा दणका

**सातारा :** शिरवळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत गंभीर गुन्हे करणाऱ्या चौघांच्या टोळीला पोलिसांनी दणका देत तडीपार केले. ऐन लोकसभा निवडणूकीत पोलिसांच्या या कारवाईने गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून एसपी समीर शेख यांच्या कालावधीत आतापर्यंत १०३ जणांना तडीपार करत कारवाईचे शतक करण्यात आले.

आतीष ऊर्फ बाबू राजेंद्र कांबळे (वय २१), विशाल शेखर वाडेकर (वय २३), रामा दादा मंडलिक (वय २०, तिघे रा. शिरवळ ता, खंडाळा) व संजय विजय कोळी (वय २१ रा. खंडाळा ता.खंडाळा जि. सातारा) अशी तडीपार केलेल्या टोळीतील गुन्हेगारांची नावे आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, या टोळीवर शिरवळ पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न करणे, जबरी चोरी करणे, घरफोडी चोरी करणे, गंभीर दुखापत पोचवून शिवीगाळ दमदाटी करणे, असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी त्या त्यावेळी या टोळीवर गुन्हे दाखल करुन त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली. मात्र त्यांच्यामध्ये कोणतीही सुधारणा होत नव्हती.

# साताऱ्यातील लल्लन टोळीवर मोक्का कारवाई

## कोल्हापूर परिक्षेत्राचे महानिरीक्षक सुनील फुलारी यांचे आदेश



**सातारा :** सातारा शहर आणि परिसरात दहशत माजवणाऱ्या लल्लन उर्फ अजय जाधव, राहणार प्रतापसिंह नगर याच्यासह त्याच्या टोळीतील १६ जणांवर मोक्का कारवाई करण्यात आली आहे. याबाबतची माहिती पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

टोळीप्रमुख अजय उर्फ लल्लन जाधव, राजू उर्फ बंटी नवनाथ लोमटे, ओंकार भरत देढे, विकास रमेश खुडे, रोहित लक्ष्मण उकिरडे, मधुरमा दत्तात्रय जाधव, अनिता दत्तात्रय जाधव, दत्तात्रय उर्फ गदरिया काशिनाथ आसवरे, जय अमर कांबळे, सुनील सुखदेव वाघमारे, मच्छिंद्र उर्फ टाकल्या भगवंत बोराटे, किरण नागनाथ उकिरडे, सागर रामा खुडे, विजय उर्फ बबल्या जाधव, पम्मी उर्फ अमिता दत्तात्रय बोराटे उर्फ जाधव, सुनीता दत्तात्रय जाधव, सर्वजण प्रतापसिह नगर खेड यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे. अजय जाधव उर्फ लल्लन या टोळीने प्रतापसिंह नगर येथे दहशत माजवून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले होते. या टोळीवर खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी मागणे, चोरी करणे, जबरी चोरी, दरोडा, दरोड्याची तयारी करणे, जबर दुखापत, घरफोडी, शासकीय कामात अडथळा, विनयभंग, बलात्कार, अपहरण, हद्दपार आदेशाचे उल्लंघन इत्यादी गुन्ह्यांची नोंद होती, या सर्व गुन्ह्यांची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यामध्ये करण्यात आली होती.

सदर टोळीने पंधरावड्यापूर्वी फिर्यादीच्या घरात घुसून तलवारी कोयते लाकडी दांडके घेऊन फिर्यादीच्या कुटुंबीयांना मारहाण केली. तसेच महिलांना लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले होते, या टोळीच्या विरोधात पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्यामार्फत मोका कारवाईचा प्रस्ताव कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांना पाठवण्यात आला होता. फुलारी यांनी या घटनेची पडताळणी करून तसेच सदर टोळीच्या विरोधातील दाखल असलेल्या गुन्ह्यांचे कागदपत्रांचे अवलोकन करून मोका प्रस्तावाची पडताळणी केली व सदर गुन्ह्यास मोका कायद्यान्वये कलमवाढ करण्याची परवानगी दिली. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा राजीव नवले यांच्याकडे देण्यात आलेला आहे.

# फलटण येथील श्रीराम मंदिरात अनिकेतराजे नाईक निंबाळकरांच्या हस्ते मोहिते पाटलांच्या प्रचाराचा शुभारंभ

**अकलूज/प्रतिनीधी**

येथील ऐतिहासीक श्रीराम मंदिरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माढा लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते व विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांचे चिरंजीव अनिकेतराजे नाईक निंबाळकर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.



यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, श्रीमंत सुभद्राराजे नाईक-निंबाळकर, श्रीमंत रघुनाथराजे नाईक-निंबाळकर, श्रीमंत प्रियलक्ष्मीराजे नाईक-निंबाळकर, श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या पत्नी श्रीमंत सौ. शिवांजलीराजे नाईक निंबाळकर, श्रीमंत सत्यजितराजे संजीवराजे नाईक निंबाळकर, भाजपचे आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांचे चिरंजीव विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, श्रीराम कारखान्याचे चेअरमन (पान ५ वर)

# वडिलांनीच दिली मुलाच्या हत्येची ७५ लाख रुपयांची सुपारी

■ **पुण्यातील शिवाजीनगर भागातील गोळीबार प्रकरण उघडकीस आणण्यास पोलिसांना यश**

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** वडिलांनीच मुलाच्या हत्येची ७५ लाख रुपयांची सुपारी दिल्याची घटना उघडकीस आली आहे. पुण्यातील शिवाजीनगर भागातील गोळीबार प्रकरण उघडकीस आणण्यास पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी वडिलांसह ६ जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

५० लाखांची सुपारी, २५ लाख दिले अन् २५ लाख काम झाल्यानंतर दिले जाणार होते.

धीरज दिनेशचंद्र आरगडे या बांधकाम व्यवसायिकावर २ जणांनी गोळीबाराचा प्रयत्न केला होता. या घटनेचा सी.सी टिव्ही सुद्धा समोर आला होता. मिळालेल्या माहितीनुसार, १६ एप्रिल रोजी पुण्यातील जंगली महाराज रस्त्यावरील अरगडे हाईट्स जवळ दुपारी ही घटना घडली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात धीरज दिनेशचंद्र अरगडे यांनी (पान ५ वर)

# संतांचे उपकार

सत्य मार्ग आचरीला ज्यांनी जग त्यांचे वैरी बनले ।
संत जनांनी कष्ट सोशिले अभिमाने नाही भरले ।
संतजनांना हे मनमानी अल्पमती ऐसे म्हणती ।
स्वार्थासाठी हे मनमानी संतांशी झगडे करीती ।
स्वतः भटकूनी तेच गुरुला भुला भटका म्हणताती ।
खंत न त्याची संतजनाना ध्यान तयावरी ना देती ।
धर्म जाणतो म्हणती तयांनी वैर जगी या वाढविले ।
कट्टर पंथी पंडित यांनी फतवे अनेक काढियले ।
आले तेव्हा कदर न केली दीप मढ्यावर लावियती ।
'अवतार' म्हणे हे मूर्ख जगी या अपुला हट्ट न सोडिती ।

जेंव्हा जेंव्हा या धरतीवर अन्यायाचे आणि अधर्माचे वादळ वाढू लागते तेंव्हा तेंव्हा या जगाचा उद्धार करण्यासाठी संत मांदियाळी अवतरित होऊन जगाला तारण्याचे कार्य करतात. बाबा अवतारसिंहजी महाराज या पदामध्ये उल्लेख करत आहेत की सत्याच्या मार्गावर चालणाऱ्यांचे जग नेहमीच वैरी बनते आणि हे अधर्मी लोकं सत्पुरुषांना त्रास देऊन त्यात आनंद मानतात परंतु संत कधीही या त्रासाला कंटाळून आपले परोपकाराचे कार्य थांबवत नाहीत कारण संतांच्या मनी दया,क्षमा,शांती आणि सदाचार भरलेले असते ते स्वतःच्या त्रासाला न जुमानता प्रभू कार्यामध्ये स्वतःला पूर्णपणे झोकून देतात व याद्वारे जगाला सन्मार्ग दाखवण्याचे काम ते करतात. त्यांच्या उपदेशाने जर मनुष्यामध्ये परिवर्तन झाले तर त्यांना आनंद प्राप्त होतो या प्रभूच्या कार्यामध्येच त्यांना समाधान प्राप्त होते. संत ज्ञानेश्वर ,संत तुकाराम ,संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत चोखामेळा व संत जनाबाई असे महान संत या महाराष्ट्राच्या धरतीत होऊन गेले ज्यांनी वेळोवेळी माणसाला या मनुष्य जन्माचे महत्त्व पटवून देऊन एका प्रभुची प्राप्ती करण्यासाठी प्रेरित केले. या समाजाला घडवताना त्यांना अपार कष्ट सोसावे लागले कारण कोणतीही फुकट मिळणारी वस्तू किंवा सल्ला त्याचे आपण मोल करत नाही त्याचप्रमाणे त्यावेळी सुद्धा त्या वेळच्या समाजाने त्यांच्या खुणा न जाणता त्यांना दुर्लक्षित केले.त्यावेळी जर त्या संतांनी असा विचार केला असता की ज्या समाजाला आपल्या उपदेशाचे मोल नाही त्या समाजासाठी आपण का त्याग करावा तर निश्चित ही ज्ञानाची गंगा आपल्यापर्यंत पोहोचलीच नसती आणि आपण अनमोल ज्ञानापासून वंचित राहिलो असतो.

बुडते हे जग,न देखवे डोळा !
म्हणुनी कळवळा येत असे !!

संतजनांनो आजतागायत या धरतीवर अनेक संत महात्म्यांनी समाजप्रबोधन करण्याचे कार्य केले आहे.भरकटलेल्या मनुष्याला त्याच्या जीवनाच्या उद्धिष्टाची जाणीव करून देऊन एक सुकर मार्ग दाखवण्याचे महान कार्य त्यांच्या द्वारे झालेले आपण पाहतो.युगा युगा पासून मानवाला सत्यापासून दूर नेण्याचे काम काही अहितवादी लोकांद्वारे वारंवार करण्यात येत होते.अंधकारमय जीवनात मनुष्य मुक्तीचे द्वार चाचपडत फिरत होता आणि फिरतच राहत होता परंतु हे दृश्य पाहून संतांना कळवळा आला आणि त्यांनी एका प्रभूची प्रचिती करून देण्याचे कार्य सुरू केले.हे कार्य करणे सोपे नव्हते कारण त्यांना अनेक प्रकारे त्रास देऊन हे त्याचे उद्दिष्ट पूर्ण होऊ नये यासाठी प्रयत्न केल्या गेले. समाज जागृत झाला तर ते खऱ्या ईश्वराच्या प्राप्तीने बंधनमुक्त होतील आणि धर्माचा पगडा घेऊन मिरवणाऱ्या लोकांना त्यांचे दुकान बंद होईल ही भीती होती.सामान्य माणसाला देवाची भक्ती करणे आणि त्याचे गुणगान करण्याची मुभा नव्हती.अश्या परिस्थितीत त्यांना आधार देण्याचे काम केवळ संतानी केले. ईश्वर हा सर्वांसाठी एकच आहे आणि त्याच्या प्राप्तीचा अधिकार सर्वांना आहे. प्रत्येकाची भक्ती करण्याची पद्धत जरी वेगवेगळी असली तरी भाव एकच असतो.

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी !
तेणे मुक्ती चारी साधियेल्या !!

ईश्वराची भक्ती करण्यासाठी खूप मोठी तपश्चर्या करावी किंवा तासनतास पूजा करावी असा कुठे उल्लेख नाही संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आपल्या शब्दात सांगतात देवाच्या द्वारी एक क्षण जरी मनुष्य सर्व विकार त्यागून उभा राहिला तरी त्याला चारही मुक्त्या त्याच क्षणी प्राप्त होतात आणि हेच समजाऊन सांगताना त्यांना समाजकंटकांनी किती त्रास दिला हे आपणास माहित आहे. धर्म मार्तंड समाजाला अंधारात ठेवून स्वतःच्या घरात उजेड करू पाहत होते म्हणून त्यांनी काही मोजके सोडून बाकी सर्वांना ग्रंथवाचन , खुल्या मध्ये भक्ती करण्याचा अधिकार नाकारला होता आणि तसे करणाऱ्याना फार मोठी शिक्षा देत असे म्हणून श्री निवृत्ती महाराजांच्या उपदेशा नंतर त्यांनी भगवद्गीतेतील संस्कृत मध्ये असणारे ईश्वराचे सखोल ज्ञान जे सर्व सामान्यांना कळत नसे त्यांनी मराठी अनुवाद करून प्रत्येकापर्यंत पोहोचवले.

तुकाराम महाराजांनी सुद्धा तुकाराम गाथेमधून अशाच ईश्वरीय ज्ञानाची प्रचिती आपल्यापर्यंत पोहोचवली त्यांनी सुद्धा या ईश्वराविषयी सांगताना स्पष्टपणे सांगितले आहे देव पाहण्याशी गेलो आणि देवची होऊन ठेलो म्हणजे ईश्वर प्राप्त करताना याचा उलगडा होतो की ज्या ईश्वराला प्राप्त करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत स्वतः आपणच त्या परमात्म्याचा अंश आहोत.हे विश्व त्याच्यामध्येच सामावलेले आहे आणि तो या कणाकणात विराजमान आहे.असा हा विश्वविराट परमात्मा साध्य करणे केवळ या मनुष्य जन्मातच शक्य आहे.

सर्व जन्मांचे शेवटी,मनुष्य जन्म पावे पाठी !
यापरी उत्तम किरीटी ,मी रचली नाही !!
- संत ज्ञानेश्वर महाराज

संत ज्ञानेश्वर महाराज समजावून सांगतात मनुष्य जन्म हा लक्ष चौऱ्यांशी फेर फिरल्यानंतर मिळतो आणि याच जन्मामध्ये या जन्माचे सार्थक करण्याचे मूळ उद्दिष्ट म्हणजे प्रभूची प्राप्ती करून या जन्म मरणाच्या बंधनातून मुक्त होता येते. जशी ईश्वर प्राप्तीची ओढ असीम असते तसेच त्याच्या प्राप्तीसाठी साधनही तेवढेच अचूक असणे गरजेचे आहे. ईश्वर आहे हे सहज कुणीही सांगू शकतो आणि त्याला पाहता येते हे पण सहजरित्या सांगितल्या जाते म्हणून गरज आहे अशा पूर्ण सद्गुरुची ज्याने स्वतः याची जाण केली आहे आणि आपल्याला तो तसाच दाखवू शकतो ज्याची ओळख संतांनी त्याला पाहिल्यानंतर आपापल्या ग्रंथात व्यक्त केली आहे.

सर्व संतांच्या एकंदरीत विचारातून असे लक्षात येते ईश्वर प्राप्त करता येतो आणि त्याला प्राप्त करण्यासाठी संतांची संगत आणि पूर्ण सद्गुरु लाभणे आवश्यक आहे. थोर संतांच्या जीवनाचा अभ्यास केला तर असे लक्षात येईल त्यांनी अशाच पूर्ण सद्गुरुची शरण घेतली आणि तदक्षणी त्यांना ईश्वर दिसला आणि त्या प्रचितीद्वारे त्यांनी आपला शोध पूर्ण केला. गुरु शिष्य परंपरा काही नवीन नाही. संतांनी दिलेले ईश्वराच्या प्रचितीचे दाखले हे त्यांच्या स्व-अनुभवातून लिहिलेले आहे आणि त्याच विचार धारेला निरंतर प्रवाहित ठेवण्याचे काम आजच्या समयाचे सद्गुरु श्री सुदिक्षा सविंदर हरदेव जी महाराज हे दिवस रात्र करत आहेत.

अवतार सिंह जी महाराज शेवटी समजावतात जे जे संत समाजासाठी अविरत झटत राहिले आणि त्यांनी केवळ या जगाच्या उद्धारासाठी आपले जीवन व्यतीत केले ते हयात असताना याच समाजाने त्यांना यातना दिल्या त्यांची कसलीच कदर गेली नाही आणि आज त्यांच्या ग्रंथांना डोक्यावर घेऊन आपण मीरवतो. संतांना या जगाकडून मानसन्मान मिळावा अशी अपेक्षा कधीच नव्हती परंतु त्यांच्या उपदेशाला मानून भक्तीमय जीवन बनावे हीच त्यांची कामना होती.मायावी सुखाची असक्ती त्यागून ते या ईश्वराच्या भक्तीमध्ये तल्लीन झाले व आजरामर झाले. या संत जनांनो आज सुद्धा अनेक प्रकारे या समाजाला भरकवटण्याचे काम सुरू आहे आणि या समाजाला ईश्वरीय ज्ञान देऊन आत्मिक समाधान देण्याचे परोपकारी कार्य संत निरंकारी मिशनद्वारे प्रत्येक गल्लीपासून ते जगातील सर्वच देशांमध्ये निस्वार्थ भावाने केल्या जात आहे. संताच्या संगतीत या मनाला स्थिरता प्राप्त होते ज्या द्वारे चंचल मन या ईश्वराच्या सानिध्यात राहून एका शुद्ध भावनेत केंद्रित होऊ शकते. असंख्य दुर्गुणांच्या प्रादुर्भावाने समाजात जे अशांततेचे वातावरण निर्माण केल्या जात आहे ते संपवण्याचे कार्य केवळ संतांच्या संगतीत बसल्यानेच होऊ शकते. आपण सर्व एकाच प्रभूची लेकरे आहोत ही भावना जेव्हा मनात पेरली जाते तेव्हाच मनुष्य एक दुसऱ्याला प्रेम देऊ शकतो. खरे सुख संपत्तीचा साठा केल्याने मिळत नाही तर नामधनाचा साठा केल्याने मिळत असते हे सत्य केवळ आणि केवळ सद्गुरुच सांगू शकतात.

संताच्या अनमोल विचारांना जीवनी स्थान देऊया
एक प्रभूची लेकरे आपण एकोप्याने राहूया.

- पवन श्रीरंगसा कुसुंदल,
नंदीग्राम सोसायटी,नांदेड
संपर्क:९०७५५९५६९५

# संपत्ती लुबाडण्याचा काँग्रेसचा कट, जनताच यशस्वी होऊ देणार नाही

## भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा रोखठोक इशारा

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** देशाची सामाजिक घडी पूर्णपणे मोडून केवळ अल्पसंख्यांक मुस्लिमांच्या लांगूलचालनाचे राजकारण करण्याचे घातक राजकारण उघडे पडल्यामुळे आता काँग्रेस हादरून गेली असून, संपत्तीचे फेरवाटप करण्याचा माओवादी कट काँग्रेसने रचल्यामुळे सावध राहणे गरजेचे आहे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी आज पत्रकार परिषदेत केले. देशातील साधनसंपत्तीवर पहिला अधिकार अल्पसंख्यांकांचा, म्हणजे मुस्लिमांचा आहे, असा दावा २००६ मध्येच तेव्हाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी केला होता. आता काँग्रेस सत्तेवर आल्यास तो प्रत्यक्षात आणला जाईल आणि गरीबांकडील संपत्ती हिरावून घेतली जाईल, असा इशाराही उपाध्ये यांनी दिला.

राजस्थानमधील बसवारा येथील जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी काँग्रेसचा हा कट उघड केल्यामुळे काँग्रेस आता भयभीत झाली असून त्यांनी थटथयाट सुरू केला आहे. मात्र, काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या राजकारणामुळेच देशातील दलित, मागासवर्गीय, ओबीसी समाज विकासापासून वंचित राहिला असून केवळ अल्पसंख्याकांची मते मिळविण्यासाठी काँग्रेसने या समाजाची कायम उपेक्षा केली आहे, असा आरोपही उपाध्ये यांनी केला. याउलट, देशाच्या विकासाची फळे समाजाच्या प्रत्येक स्तरावरील अखेरच्या व्यक्तिपर्यंत पोहोचली पाहिजेत, सरकारच्या प्रत्येक योजनेचा संपूर्ण लाभ खऱ्या लाभार्थीला मिळाला पाहिजे आणि प्रत्येक कुटुंबाला सक्षमतेच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत, यावर मोदी सरकारने नेहमीच भर दिला आहे. अंत्योदयाच्या संकल्पनेवर भारतीय जनता पार्टीची श्रद्धा असून अंत्योदयाच्या नीतीवरच पक्षाची वाटचाल सुरू असल्याने मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत आखलेल्या प्रत्येक योजनेचे लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले आहेत, असा दावाही उपाध्ये यांनी केला.

गरीबांच्याही संपत्तीवर डोळा असलेली व संपत्ती काढून घेऊन अन्य समाजात तिचे वाटप करण्याचा कट आखणारी काँग्रेस व प्रत्येक समाजघटकास संपत्ती निर्माण करण्याच्या संधी देणारी भाजप असा हा सामना आहे, असेही ते म्हणाले. मुस्लिमांचे लांगूलचालन करून निवडणुका जिंकण्याचे काँग्रेसचे राजकारण १९६० च्या दशकापासून सुरू आहे, आणि भाजप सातत्याने याविरुद्ध संघर्ष करत आहे. एका बाजूला तुष्टीकरणाचे राजकारण आणि दुसरीकडे मोदी सरकारचे विकासाचे राजकारण यांतील या संघर्षात देशातील जनतेने कायमच विकासाच्या राजकारणास साथ दिल्यामुळेच प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसची सातत्याने हार होत असल्याने आता जनतेच्या संपत्तीवर काँग्रेसचा डोळा आहे, असा आरोपही त्यांनी केला. लोकांकडील अतिरिक्त संपत्ती काढून घेण्याची ही मूळ विचारसरणी माओवादी-नक्षलवाद्यांची असून काँग्रेस आता ती प्रत्यक्षात आणू पाहात आहे, असे ते म्हणाले.

काँग्रेसच्या २०२४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात असे स्पष्टपणे नमूद आहे की, देशातील जाती, उपजातींच्या सामाजिक, आर्थिक स्थितीची गणना करण्यासाठी देशव्यापी कार्यक्रम राबविला जाणार असून त्यातून मिळणाऱ्या माहितीच्या आधारावर पुढील कार्यवाहीचा दिशा मजबूत केली जाईल, असे काँग्रेसच्या २०२४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद केले गेले आहे. या देशात बहुसंख्यवादाला थारा नाही, असेही काँग्रेसने म्हटले असून अल्पसंख्यांना आर्थिक मदत, शैक्षणिक लाभ, सार्वजनिक रोजगार, कौशल्य विकास, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रांत अधिक संधी देण्याची हमी काँग्रेसने दिली आहे. मागासवर्गीय जातीजमातींसाठी असलेल्या आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादा हटवून ती वाढविली जाईल. अल्पसंख्यांकांना अधिकाधिक लाभ मिळविण्याचीच ही योजना असून संपत्ती व उत्पन्नातील असमानता दूर करण्याच्या काँग्रेसच्या आश्वासनामुळेदेखील अतिरिक्त संपत्तीधारकांची संपत्ती अल्पसंख्याकांकडे वळविण्याचा छुपा हेतू उघड झाला आहे, असे ते म्हणाले.

देशाचा एक्स रे करून वित्तीय संस्थांचे सर्वेक्षण करण्याचा व देशातील संपत्तीचे स्रोत शोधण्याचा काँग्रेसचा इरादा राहुल गांधी यांनी ५ एप्रिल रोजी जाहीरनामा जारी करतानाच उघड केला होता, मात्र, त्याचे कथानक फार पूर्वीच लिहिले गेले आहे. कोणाकडे किती संपत्ती आहे हे शोधून काढण्याची मोहीम हाती घेण्याचे १६ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्रात बोलतानाही राहुल गांधी यांनी जाहीर केले होते, तर ६ एप्रिल २०२४ रोजी तेलंगणात बोलताना, 'जिसकी जितनी आबादी, उतना उसका हक' असे जाहीर करून त्यांनी संपत्तीच्या वितरणाचा कट उघडही केला आहे, असा आरोप उपाध्ये यांनी केला. गरीब, मागासवर्गीयांची कमाई, महिलांची बचत काढून घेऊन त्यातील मोठा वाटा अल्पसंख्याकांच्या ताटात घालण्याचा काँग्रेसचा इरादा यातूनच स्पष्ट झाला आहे, असे ते म्हणाले.

याआधी, १९६३ व १९७४ मध्ये जवाहरलाल नेहरू व इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने तर, 'कम्पल्सरी डिपॉझिट स्कीम कायदा' या गोंडस नावाखाली लोकांची संपत्ती जप्त करण्यासंबंधीचे कायदेच संमत केले होते, व त्यामुळे आपल्या कमाईचा १८ टक्के हिस्सा सरकारजमा करणे सरकारी कर्मचारी व संपत्तीधारकांना भाग पडत होते. ही संपत्ती तीन ते पाच वर्षे सरकारी तिजोरीत गोळा केली जात होती, व विशेष म्हणजे, देशातील साधनसंपत्तीवर पहिला हक्क अल्पसंख्याकांचा आहे असे म्हणणारे डॉ. मनमोहन सिंह हेच तेव्हा सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार होते, याकडेही उपाध्ये यांनी लक्ष वेधले.

अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण करण्यासाठी साधनसंपत्ती त्यांच्याकडे सुपूर्द करण्याची डॉ. मनमोहन सिंह यांची ही भूमिकाही अचानक जन्माला आली नव्हती. अनुसूचित जातींच्या यादीत मुस्लिमांचा समावेश करणे, सरकारी नोकऱ्यांत मुस्लिमांना १५ टक्के आरक्षण ठेवणे, धर्माच्या नावाखाली ओबीसी आरक्षणाचे विभाजन करून मुस्लिमांकरिता सहा टक्के रक्षण ठेवणे व धर्मांतरानंतरही अनुसूचित जातींचा दर्जा कायम ठेवणे असे अनेक प्रयत्न काँग्रेसकडून सुरू होते असा दावादेखील श्री. उपाध्ये यांनी केला. डॉ. मनमोहन सिंह यांच्या या वक्तव्याच्या काही दिवस अगोदर सच्चर समितीचा अहवाल आला आणि मुस्लिमांची स्थिती दलितांहूनही बिकट असल्याचा दावा त्यामध्ये केला गेला, हा काही निव्वळ योगायोग म्हणता येईल का, असा सवालही त्यांनी केला. काँग्रेसला देशातीलसामाजिक व्यवस्थेची वीण नष्ट करायची असून केवळ मते मिळवून सत्तेचे लोणी ओरपण्यासाठी अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाचे राजकारण करायचे आहे. भारतीय जनता पार्टीने नेहमीच अशा राजकारणाविरोधात संघर्ष केला असून आता देशातील जनता काँग्रेसचा हा कट उधळून लावेल, असा विश्वासही उपाध्ये यांनी या पत्रकार परिषदेत शेवटी व्यक्त केला.

# राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी मशाल घराघरात पोहोचवावी : प्रतीक पाटील



### वाढती महागाई बेरोजगारी भ्रष्टाचारामुळे जनता हैराण

**शिरोळ :** देशात वाढती महागाई तसेच बेरोजगारी व होत असलेला भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य जनता अक्षरशः हैराण झाली आहे यामुळे जनतेला परिवर्तन पाहिजे त्यामुळे महाविकास आघाडीला पोषक वातावरण निर्माण झाले आहे हातकलंगले लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील सरुडकर यांना प्रचार दौऱ्या दरम्यान मोठा प्रतिसाद मिळत आहे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मशाल हे चिन्ह घराघरात पोहोचवून सरुडकरांच्या विजयासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे युवा नेते व राजारामबापू सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रतीकसिंह पाटील यांनी केले

शिरोळ येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते यावेळी त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांनाही उत्तरे दिली ते म्हणाले की शासनाने परवानगी दिली तरी उसाचे मागील शंभर रुपये द्यावे लागतील माजी आमदार सत्यजित पाटील सरूडकर हे दहा वर्षे आमदार होते या काळात त्यांनी शाहूवाडी वाळवा शिराळा पन्हाळा या ठिकाणी मोठी विकास कामे केली आहेत त्यांचा संपर्क ही मोठा आहे तसेच महाविकास आघाडीचे सर्वच नेते मंडळी त्यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत जनतेचा मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता सत्यजित पाटील सरूडकर यांचा विजय निश्चित आहे असे त्यांनी सांगितले

यावेळी सत्यजित पाटील सरुडकरांना विक्रमी मतांनी विजयी करण्याचा निर्धार बैठकित करण्यात आला युवा नेते प्रतिकसिंह पाटील व रोहितदादा पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधून महाविकास आघाडीचे हातकणंगले लोकसभा मतदार संघांचे उमेदवार सत्यजित पाटील - सरुडकर यांना विजयी करण्यासाठी प्रचार यंत्रणेतील रणनीती स्पष्ट केली

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शिरोळ तालुकाध्यक्ष विक्रमसिंह उर्फ बंटी जगदाळे कोल्हापूर जिल्हाउपाध्यक्ष बी जी माने जिल्हा कार्याध्यक्ष रावसाहेब भिलवडे तालुका महिला अध्यक्ष स्नेहाताई देसाई सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष संदीप बिरणगे दिगंबर सकट डी पी कदम वसंतराव देसाई दिनेश कांबळे राजगोंडा पाटील श्रेणीक कोगनोळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# आरटीई प्रवेशाच्या नवीन नियमाला हायकोर्टात आव्हान

**नागपूर :** सरकारी व अनुदानित शाळांपासून एक किलोमीटर परिसरात कार्यरत असलेल्या स्वयंअर्थसहाय्यित खासगी शाळांना आरटीई प्रवेशातून सूट देण्याच्या नवीन नियमालामुंबईउच्च न्यायालयाच्यानागपूरखंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. न्यायमूर्तिद्वय नितीन सांबरे व अभय मंत्री यांनी बुधवारी या प्रकरणावरील सुनावणीनंतर शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे सचिव, उपसचिव व आयुक्त यांना नोटीस बजावून ८ मेपर्यंत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले.नवीन नियमाविरुद्ध शिक्षण हक्क कार्यकर्ते वैभव एडके, राहुल शेंडे, वैभव कांबळे व अनिकेत कुत्तरमारे यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. मोफत व सक्तीचे शिक्षण नियमानुसार वंचित, दुर्बल आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांसाठी स्वयंअर्थसहाय्यित खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखिव ठेवल्या जातात. या जागांवर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क सरकारद्वारे अदा केले जाते. जुन्या नियमानुसार, विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटर परिसरात असलेल्या स्वयंअर्थसहाय्यित खासगी शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत तर, तीन किलोमीटर परिसरात असलेल्या स्वयंअर्थसहाय्यित खासगी शाळांमध्ये इयत्ता सहावी ते आठवीपर्यंत आरटीई प्रवेश दिले जात होते. दरम्यान, आरटीई प्रवेश शिक्षण शुल्काची थकबाकी सतत वाढत गेल्यामुळे सरकारने या शैक्षणिक सत्रापासून वरीलप्रमाणे नवीन नियम लागू केला आहे.

# संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात संपन्न

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयामधून पासआऊट झालेल्या सर्व बॅचच्या माजी विद्यार्थांचा मेळावा पुणे येथे उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याला पुणे, मुंबई, नाशिक सह राज्यभरात कार्यरत असणारे सर्व माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे सहसचिव एन. आर. भोसले उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजीव जैन होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजन करून करण्यात आली. यावेळी मेळाव्याला उपस्थित असणाऱ्या सर्व




माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एन. आर. भोसले यावेळी बोलताना म्हणाले कि, संजीवन संस्थेच्या जडणघडणीमध्ये माजी विद्यार्थ्यांचे योगदान खूप मोलाचे आहे. म्हणूनच संजीवन संस्था आणि तुम्ही सर्व माजी विद्यार्थी मिळून अनेक सामाजिक उपक्रम राबवायचे आहेत. याच उद्देशाने आपण आज पुणे येथे या कार्यक्रमाचे आयोजन केले असून पुणे येथे माजी विद्यार्थी संघटनेची शाखा स्थापन करत आहोत. कार्यक्रमाचे आयोजक डॉ. अजित काटकर यावेळी बोलताना म्हणाले कि, संजीवन संस्था आणि तुम्ही सर्व विद्यार्थी यांचे ऋणानुबंध दृढ राहावेत म्हणून हि शाखा सुरु केली आहे.

कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अजित काटकर यांनी केले होते. यावेळी प्राचार्य डॉ. संजीव जैन, डिप्लोमा प्राचार्य प्रा. निशांत थरकार, उपप्राचार्य डॉ. सुहास सपाटे, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. एकनाथ साळोखे, सर्व विभागाचे विभागप्रमुख यांच्यासह माजी विद्यार्थी इंद्रजीत पारखे, अविनाश शिंदे, प्रीतम कोळी, भारत माळी, प्रीतम लिमये, अनामिका पोवार, श्रद्धा कुंभार-तावडे आदींसह मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिंनी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सरदार देशमुख यांनी केले. सदर कार्यक्रमास प्रा. अनारकली मोमीन, प्रा. विशाल पोवार, बाळासाहेब कुंभार, दिपक पाटील, कृष्णात शिंदे व सागर पाटील यांचे सहकार्य लाभले.

# महाविकास आघाडीच्या कुरुंदवाड येथील प्रचार सभेत एका महाविद्यालयाचे प्राध्यापक कर्मचारी यांचा सहभाग

## निवडणूक अधिकारी कोणती कारवाई करणार चर्चा

**कुरुंदवाड :** कुरुंदवाड येथे महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्या प्रचार सभेत एका महाविद्यालयाचे काही प्राध्यापक कर्मचारी यांचा सक्रिय सहभाग दिसून आला सर्व कार्यक्रमाचे आयोजन हीच मंडळी केल्याचे स्पष्ट जाणवत होते पगार शासनाचा घ्यायचा आणि एका पक्षाचा प्रचार करायचा अशी खमंग चर्चा सभास्थळी चर्चेली जात होती निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या आदर्श आचारसंहिते भंग झाला आहे का याची चौकशी निवडणूक निरीक्षकाने करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे

एका पक्षाच्या नेत्यांनी माझ्याकडे किती मनुष्यबळ आहे हे दाखवण्यासाठी शिक्षकांची भरती या कार्यक्रमात केल्याचे उघडपणे दिसत होते त्यांनीच ही सभा हातात घेतल्याचे चित्र पाहायला मिळत होते निवडणूक आयोगाने शिक्षकांचा निवडणुकीत सहभाग असल्यास त्यांच्यावर कडककारवाई केली जाईल असे परिपत्रक असताना देखील नेत्याच्या हित सांभाळण्यासाठी याचा विसर त्या शिक्षकांना पडला होता की काय असा सवाल उपस्थित होत आहे त्याचेही आश्चर्य सभास्थानी असलेल्या नागरिकांतून व्यक्त होत होते

दरम्यान या सभेच्या आयोजन आणि नियोजनावरून काँग्रेसच्या स्थानिक नेत्याच्या समर्थकात व सेनेच्या एका पदाधिकाऱ्या बरोबर शाब्दिक चकमक झाल्याचेही दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे एका पक्षाचा एका गटाचा आणि गटनेत्याचा हा इव्हेंट नाही तर महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाच्या अधिकृत उमेदवार यांचीही प्रचार सभा आहे याचे भान ठेवायला हवे असेही त्या सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी खडसावल्याचे समजते कुरुंदवाड शहरातील एका महाविद्यालयाच्या प्राध्यापकावर कर्मचाऱ्यावर निवडणूक अधिकारी कोणती कारवाई करणार याकडे कुरुंदवाड शहरासह तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# गेल्या १० वर्षात नवी गुंतवणूक न झाल्याने पुण्यात तरुणांच्या बेकारीचा मोठा प्रश्न : रवींद्र धंगेकर

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** काँग्रेस राजवटीत पुण्यामध्ये फार मोठी गुंतवणूक वाढली. काँग्रेस पक्षाने पुण्याला आयटी सिटी केले, वाहन उद्योग निर्मितीचे केंद्र बनवले, त्यामुळे शेकडो देशी परदेशी कंपन्यांनी पुण्यात गुंतवणूक केली व लाखो नवे रोजगार पुण्यात काँग्रेस राजवटीत निर्माण झाले. गेल्या १० वर्षात मात्र केंद्रात, राज्यात व पुण्यात भाजप सरकार असूनही पुण्यात कोणतीही नवी गुंवणूक त्यांनी आणली नाही. त्यामुळे गेल्या १० वर्षात लाखो तरुण – तरुणींच्या, नोकरी – रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. या साठीच आता परिवर्तन आवश्यक आहे. मतदानाच्या दिवशी पंजाच्या चिन्हापुधील बटन दाबून काँग्रेसला विजयी करा, असे आवाहन महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी केले. कसबा विधानसभा मतदार संघात झालेल्या भव्य पदयात्रेनंतर ते बोलत होते.



ही पदयात्रा शहराच्या मध्य भागातील दाट वस्तीतून जाताना अनेक गणेशोत्सव मंडळे व व्यापाऱ्यांनी धंगेकरांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. महाविकास आघाडी व इंडिया आघाडीच्या पक्षांचे झेंडे डौलाने फडकत होते. ढोल ताशांच्या गजरात निघालेल्या या पदयात्रेतील नागरिक व कार्यकर्त्यांना उत्स्फूर्तपणे पाणी दिले जात होते. मागार्वरील अनेक मंदिरांमध्ये व गुरुद्वारात जाऊन उमेदवार धंगेकर यांनी दर्शन घेतले. तसेच ठिकठिकाणी हनुमान जन्मोत्सवाच्या कार्यक्रमातही ते सहभागी झाले. मोतीचौक आणि गणेशपेठ गुरुद्वारा जवळील हनुमान मंदिर येथे जाऊन त्यांनी श्री हनुमानाचे दर्शन घेतले. साखळी वीर तालीम येथे जाऊन त्यांनी प्रथम हनुमानाच्या प्रतिमेस वंदन करून तालमीतील पैलवानांची भेट घेतली. तसेच आखाड्यात उतरून आखाड्यातील माती हातात घेऊन ती आखाड्यात अर्पण केली. पैलवानांनी रवींद्र धंगेकर यांना दिलेली मुदगल हातात घेऊन त्यांनी प्रत्येक पैलवानाला प्रोत्साहन दिले. तेव्हा जयजयकाराच्या घोषणाही चालू होत्या. मागील वर्षी झालेल्या आमदारकीच्या निवडणुकीतील आठवणींना अनेक जण उजाळा देत भक्कम पाठिंब्याची खात्री देत होते. जुन्या वाड्यांमधील नागरिकही मोठ्या संख्येने रस्त्यावर येऊन स्वागत करत होते तसेच महिला देखील मोठ्या प्रमाणात येऊन धंगेकरांचे औक्षण करीत होत्या. अनेक ठिकाणी फुलांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत केले गेले.

या पदयात्रेत पहिल्या महिला महापौर कमल व्यवहारे, माजी नगरसेवक वीरेंद्र किराड ,माजी नगरसेवक रवींद्र माळवदकर, माजी नगरसेवक विशाल धनावडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शहर प्रमुख संजय मोरे, उपशहर प्रमुख राजेंद्र शिंदे व बाळासाहेब मालुसरे, शहर काँग्रेस सरचिटणीस गणेश शेडगे व शिवराज भोकरे, कसबा काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष अक्षय माने, राष्ट्रवादीचे ब्लॉक अध्यक्ष गणेश नलावडे, विभाग प्रमुख चंदन साळुंखे, आम आदमी पक्षाचे किरण कद्रे, प्रभाग क्र.१७ चे काँग्रेस अध्यक्ष कुणाल जाधव, नरेश नलावडे, राजेंद्र आलमखाने, कसबा महिला ब्लॉक अध्यक्ष प्रतिभा शिंदे, स्वाती कथलकर, निकिता मारटकर, राष्ट्रवादीच्या कसबा महिला अध्यक्ष सुरेखा पारेख, प्रसाद गावडे, शंतनू हिंगमिरे, गोरख पळसकर, महेश हराळे, संतोष कोहराळकर, प्रविण करपे, संदीप आटपाळकर, ओंकार धावडे, चंदन पाचंगे, सुरेश कांबळे सहभागी झाले होते.

## निवडणूक निरीक्षक प्रसाद लोलयेकर यांची माध्यम कक्षाला भेट



**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम संनियंत्रणासाठी स्थापित करण्यात आलेल्या माध्यम कक्ष, निवडणूक खर्च समिती कक्ष व सी-व्हिजील कक्षास पुणे लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक प्रसाद लोलयेकर यांनी भेट दिली.

यावेळी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, सी-व्हिजील कक्षाच्या समन्वयक अधिकारी ज्योती कावरे उपस्थित होत्या.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी तीनही कक्षातील कामकाजाविषयी माहिती दिली. माध्यम कक्षाद्वारे समाजमाध्यमांवरील जाहिरातींवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे सांगितले. सीव्हिजील ॲपवर येणाऱ्या तक्रारींबाबतही तातडीने कार्यवाही करण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

निवडणूक निरीक्षक श्री. लोलयेकर यांनी माध्यम कक्षात इलेक्ट्रॉनिक, मुद्रीत व समाजमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या जाहिराती, पेड न्यूज यावर अंकुश ठेवण्यासाठी करण्यात येत असलेल्या कामाकाजाची, तसेच खर्च समिती व सी-व्हिजील कक्षाच्या कामकाजाची माहिती घेतली.

## बुलेटच्या धडकेत पादचारी जखमी

**सातारा :** हिरापूर, ता. सातारा गावच्या हद्दीत बसथांब्याजवळ युवकाने चुकीच्या पध्दतीने बुलेट (एमएच ११ डीजी ८३६०) चालवत पायी चाललेल्या एका व्यक्तीस धडक देवून गंभीर जखमी केले. कृष्णा बाबुराव पवार (वय ५०, रा. हिरापूर) असे अपघातग्रस्त व्यक्तीचे नाव आहे. दि. १९ रोजी रात्री ९ वाजता ही घटना घडली.

सातारा तालुका पोलीस ठाण्यात जखमी पवार यांची मुलगी हेमा आत्माराम देवरुखे (वय २८, रा. दिव्यनगरी, सातारा) यांनी फिर्याद दिली असून, प्रज्वल जगन्नाथ शेलार (वय २४, रा. गवडी, ता. सातारा) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस नाईक वायदंडे तपास करत आहेत.

# समाज माध्यमातून वाचन चळवळीला बळ - आदित्य कहाणे

### राजगुरुनगर येथील सार्वजनिक वाचनालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन

**राजगुरुनगर (वा.) :** तरुणाईची क्रेज असणारी विविध समाज माध्यमाच्या प्रभावी वापरातून वाचन चळवळीला बळ मिळेल असे मत इस्टांग्राम वरील आपलं राजगुरुनगर या ब्लॉगरचे अदित्य कहाणे यांनी व्यक्त केले.

राजगुरुनगर येथील सार्वजनिक वाचनालयात जागतिक पुस्तक दिना निमित्त आयोजित पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन कहाणे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात विविध विषयांवरील ५०० पेक्षा अधिक पुस्तके प्रदर्शित करण्यात आली होती.

यावेळी बोलताना कहाणे यांनी समृद्ध परंपरा असणारे सार्वजनिक वाचनालय व त्यांचे वाचकांचे कौतुक करत महाराष्ट्रातील वाचनालयांनी आजची तरुणाई वापरत असणाऱ्या विविध समाज माध्यमाचा प्रभावी वापर केला तर वाचन चळवळ वाढीस प्रेरणा मिळेल. तसेच वाचकप्रिय असणाऱ्या विविध विषयांवरील पुस्तकाची माहिती या समाज माध्यमावर प्रसारीत केली तर अवघी तरुणाईचा वाचनाचा कल वाढेल असे सांगत पुस्तक वाचनातून संवाद कौशल्याची प्रेरणा मिळते, प्रत्येक पुस्तक वाचनातून वेगवेगळे ज्ञान प्राप्त होते त्यामुळे विविध विषयांवरील पुस्तके वाचली पाहिजे.





यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष प्रमोद गानू, उपाध्यक्ष सदाशिव अमराळे, सुधाकर मिडगे, डॉ. हेमंत सातारकर उल्हास गाडेकर, वसंत वाबळे, हरी कुलकर्णी, राहुल कांबळे, राजेंद्र राशिनकर, कल्पना वाव्हळ, अक्षता मुळुक संध्या कुलकर्णी, साक्षी बुट्टे, व मोठ्या संख्येने वाचक उपस्थित होते.

उपस्थितांप्रति सर्वांचे मानद सचिव राजेंद्र सुतार यांनी आभार व्यक्त केले.

### विश्रामबाग वाहतूक विभागांतर्गत

## नो-पार्किंगबाबत वाहतूक शाखेकडून अंतिम आदेश जारी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत राहण्याच्या अनुषंगाने पुणे शहर वाहतूक शाखेने यापूर्वी विश्रामबाग वाहतूक विभागांतर्गत काढलेल्या तात्पुरत्या आदेशांवर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करुन अंतिम आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार टिळक स्मारक मंदिर प्रवेशद्वाराच्या भिंतीलगत २० मीटर व नारळीकर इन्स्टिटयूटकडून टिळक स्मारक मंदिरकडे येताना (कुमार स्टेशनरी व झेरॉक्स दुकान) रस्त्याच्या उजव्या बाजूस ५० मीटरपर्यंत नो पार्किंग करण्यात येत आहे.

हे आदेश अग्नीशमन, पोलीस वाहने, रुग्णवाहिका आदी अत्यावश्यक सेवेतील वाहनांसाठी लागू नसतील असेही वाहतूक शाखेचे पोलीस उप-आयुक्त रोहिदास पवार यांनी काढलेल्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## हांडेवाडीत एकता युवा प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**हडपसर : प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती हांडेवाडी चौकात साजरी करण्यात आली. हडपसर पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरणचे एपीआय अर्जुन कुदळे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.एकता युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विशाल धावारे यांनी जयंतीचे आयोजन केले होते.

यावेळी किरण धावारे, गोकुळ कोळी, अमोल हजारें, आकाश सरवदे , राहुल सरवदे, मयुर हांडे, कल्पना हांडे, स्वपनील हांडे, प्रज्वल न्हावले, लाला सोनवणे,दिपाली कवडे, पुनम धावारे बनसोडे, ज्योती धावारे, रोहणी सरवदे सावंत, रुपाली कवडे, प्रेम वासुदेव, सतिष कांबळे, ज्ञानेश्वर सोनवणे, बालाजी भडके, मयुर विरकर, विलास सांवत, अभिजीत बनसोडे, सुरज वाघमारे, धनराज पाटील, दिनेश मोरे, अभिषेक कदम, मुख्य आयोजक विशाल धावारे अध्यक्ष सह एकता युवा प्रतिष्ठाण हांडेवाडेचे सदस्य उपस्थित होते.

जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

## वडगावात पोटोबा महाराजांच्या दर्शनाला लाखो भाविकांची गर्दी

**वडगाव मावळ :** मावळ तालुक्याचे श्रध्दास्थान असलेल्या वडगाव मावळ येथील श्री पोटोबा महाराज उत्सवाला मंगळवार ( दि २३) मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.भल्या पहाटेपासून पोटोबा जोगेश्वरी मंदिरात दर्शन घेण्याकरिता स्थानिकासह पुणे जिल्ह्यासह मावळ पंचक्रोशीतील कानाकोपर्यातून भाविकांनी गर्दी केल्याने वडगाव परिसर भाविकांनी गजबजला होता.

यावेळी अभिषेक, छबिना, मानाचे बगाड, मानाच्या काठ्या, भजन स्पर्धा आदी कार्यक्रम उत्साहात पार पडले. यावेळी 'पोटोबाच्या नावानं.. चांगभलं', असा अखंड जयघोष करण्यात आला.

पहाटे देवस्थानचे सर्व विश्वस्त व उत्सव कमिटीचे पदाधिकारी यांच्या हस्ते श्री पोटोबा महाराज व जोगेश्वरी मातेच्या मूर्तींना अभिषेक घालून उत्सवाची सुरुवात झाली.यानंतर महापूजा, महाआरती व श्री हनुमान मंदिरामध्ये हनुमान जन्मोत्सव सोहळा पार पडला.



सकाळी चावडी चौकातील गुरव वाड्या पासून मंदिरापर्यंत छबिना काढण्यात आला.यावेळी छबिना मार्गावर फुले अंथरूण चौघडा वादनासह मोठ्या उत्साहात श्रींचे आगमन झाले. त्यानंतर श्रींची पूनर्स्थापना करून पेशवेकालीन सोन्याचे मुखवटे परिधान करण्यात आले. दुपारी मानकरी गणेश गोविंदराव ढोरे यांच्या हस्ते मिरवणूक व पूजा करून मानाचे बगाड सुरू करण्यात आले. यावेळी अनेक भाविकांनी नवस फेडण्यासाठी व बगाड पाहण्यासाठी गर्दी केली होती तसेच मावळ तालुक्यातील येळसे व शेटेवाडी येथून आलेल्या मानाच्या काठ्यांचे उत्साहात आगमन झाले.

सायंकाळनंतर भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. उत्सवानिमित्त रात्री भजन हरी सागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पोटोबा महाराज उत्सव समितीचे उत्सव समितीचे अध्यक्ष किरण म्हाळसकर कार्याध्यक्ष तुषार वहिले कार्यक्रम प्रमुख बाळासाहेब तुमकर, सतोष भिलारे, खजिनदार अनिल कोद्रे, संजय दंडेल, सचिव अतिश ढोरे, खंडुजी जाधव, भरत तुमकर, हनुमत ढोरे, उमेश ढोरे, सुहास विनोदे, सतिश गाडे यांसह अन्य पदाधिकारी उत्सवाचे संयोजन करत आहेत.

यावेळी पोटोबा देवस्थानचे विश्वस्त गणेशअप्पा ढोरे, सुभाषराव जाधव, चंद्रकांत ढोरे, अनंत कुडे, तुकाराम ढोरे, अरुण चव्हाण, सुनिता कुडे, किरण भिलारे, पुजारी विवेक गुरव, आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पालखी ग्राम प्रदिक्षणेने उत्सवाची सांगता..**

**बुधवारी सकाळी ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज व जोगेश्वरी मातेची पालखी गावांतून प्रदिक्षणा काढण्यात आली.यावेळी बैलगाडीतून नगारा वादन तसेच महाराजांच्या पालखी समोर आळंदी येथील बाल वारकरी भजन मंडळाच्या टाळमृदुंगाच्या आवाजाने वडगावात धार्मिक उत्सव वातावरण निर्माण झाले होते.**

## केंद्र व राज्य शासनामार्फत केलेली कामे मतदारांपर्यंत पोहोचवा - खासदार बारणे





■ लोणावळा येथे महायुतीच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**लोणावळा :** केंद्र व राज्य शासनाने घेतलेले जनहिताचे निर्णय आणि मोठ्या प्रमाणात केलेली विकास कामे कार्यकर्त्यांनी मतदारांपर्यंत पोहोचवावीत, अशी सूचना मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीसाठी लोणावळा येथे सुरू करण्यात आलेल्या महायुतीच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन खासदार बारणे यांच्या हस्ते काल (मंगळवारी) करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, लोणावळ्याच्या माजी नगराध्यक्ष सुरेखा जाधव, उपनगराध्यक्ष श्रीधर पुजारी, भाजपचे प्रचार प्रमुख रवींद्र भेगडे, माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर, भाजपचे तालुकाध्यक्ष भाऊ गुंड, शहराध्यक्ष अरुण लाड, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुकाप्रमुख राजेश खांडभोर, शहरप्रमुख संजय भोईर, आरपीआयचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर भालेराव तसेच जीवन गायकवाड, बाळासाहेब सकट, आशिष बुटाला, विजय सकट आदी मान्यवर उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशामध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे झाल्याने तसेच देशहिताचे महत्त्वपूर्ण निर्णय झाल्यामुळे देशवासीयांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी मतदारांपर्यंत पोचून जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

लोणावळा परिसरात केलेल्या विविध विकास कामांची माहिती देखील खासदार बारणे यांनी यावेळी दिली.

त्यापूर्वी खासदार बारणे यांनी लोणावळ्यातील काही मान्यवरांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. हनुमान जयंती उत्सवानिमित्त काही मंदिरात जाऊन दर्शन घेतले. माजी नगराध्यक्ष सुरेखा जाधव, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, प्रमोद गायकवाड, संजय अडसूळे आदींच्या निवासस्थानी भेट दिली. नांगरगाव येथील लोणावळा औद्योगिक सहकारी वसाहतीच्या कार्यालयात जाऊन त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. अध्यक्ष संदीप कोराड, उपाध्यक्ष शीतल पतंगे, संचालक नितीन सोनवणे तसेच लहू भोकसे आदींनी त्यांचे स्वागत व सत्कार केला.

तुंगार्ली येथील जाखमाता देवी मंदिर, हनुमान मंदिर, खंडाळा येथील जय मल्हार मित्र मंडळाचे श्री खंडोबा देवस्थान, खोंडगेवाडी येथील हनुमान तरुण मंडळाचा हनुमान जन्मोत्सव, सिद्धार्थ नगर येथील श्री संत रोहिदास तरुण मंडळ, जेतवन विहार आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मृती भवन या ठिकाणीही खासदार बारणे यांनी भेट दिली. जेतन विहार येथे विजय जाधव, संजय अडसुळे, प्रफुल्ल काकडे, योगेश अडसुळे, गौतम गायकवाड, उषा जाधव, सुरेखा चौरे, प्रभाकर गायकवाड आदींनी बारणे यांचा सत्कार करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जागतिक पुस्तक दिनानिमित्त 'दादाच्या शाळेतील' मुलांना पुस्तकांची भेट



**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** राष्ट्रीय पुस्तक न्यास, पुणे पुस्तक महोत्सव यांच्यातर्फे जागतिक पुस्तक महोत्सवानिमित्त अभिजित पोखर्णीकर, शुभम माने यांच्या दादाची शाळा उपक्रमातील मुले, ज्येष्ठ नागरिकांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, किशोरचे संपादक किरण केंद्रे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रसेनजीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर, संजय चाकणे या वेळी उपस्थित होते. मुलांचा जाहीरनामा सुनील पांडे, प्रसेनजित फडणवीस यांना देण्यात आला. भांडारकर संस्थेच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला.

डॉ. सोनावणे म्हणाले, की मिळेल ते वाचले पाहिजे आणि लक्षपूर्वक वाचले पाहिजे. एकाचवेळी वेगवेगळी पुस्तके वाचता येऊ शकतात. तसेच इतरांना वाचण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. वाचनातून दररोज एक नवीन शब्द शिकला पाहिजे.

पुस्तकाच्या वाचनाची आवड हळूहळू लागते. वाचनाने आत्मविश्वास वाढतो, ज्ञान मिळते, आयुष्य बदलून जाते. अन्न, वस्त्र, निवाऱ्याप्रमाणे पुस्तक ही मुलभूत गोष्ट आहे, वाचणारा माणूस चांगला माणूस होतो, असे किरण केंद्रे यांनी सांगितले.

काळकर म्हणाले, की रोज काहीतरी वाचले आणि लिहिले पाहिजे. लिहू, वाचू आणि व्यक्त करू शकतो हे माणसाचे वेगळेपण आहे. माणूस जन्माला येताना कोरी पाटी घेऊन येतो आणि पुस्तके माणसाला विचार करायला शिकवतात.

# मतांचा टक्का घसरला : पूर्व विदर्भात धक्का कुणाला!

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात नागपूर,रामटेक, भंडारा - गोंदिया,गडचिरोली - चिमूर आणि चंद्रपूर या पूर्व विदर्भातील पाच मतदारसंघात मतदानाची टक्केवारी घटल्याने त्याचा फटका कुणाला बसतो हाच मुद्दा आता राजकीय वर्तुळात महत्वाचा ठरला आहे. गत लोकसभा निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी पाहिली तर मतदारांमध्ये निरुत्साह कशामुळे ? हा प्रश्न स्वाभाविक पणे ऐरणीवर आला असला तरी उन्हाचा तडाखा आणि वाढत्या तापमानामुळे मतदान कमी झाले का? हा मुद्दाही चर्चेत आला आहे मात्र तो महायुती अथवा महा विकास आघाडीला तापदायक ठरतो का याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

गतवेळी नागपूर लोकसभा मतदारसंघात ५४.७४टक्के मतदान झाले होते.यंदा ५३.९० टक्के मतदान झाले आहे.६२.१२टक्के मतदानाची टक्केवारी रामटेक मतदारसंघात होती ती यंदा ५९.९० टक्क्यांवर आली आहे.चंद्रपूर मतदारसंघात मागील निवडणुकीत ६४.८४ टक्के मतदान यावेळी ६२ टक्क्यांवर आले आहे. तर गडचिरोली मतदारसंघात ७२ टक्के असलेले मतदान यंदा ६६.२७ टक्के ,भंडारा - गोंदिया मतदारसंघात ६८.३७ टक्के मतदान यंदा ६१.३७ टक्के इतके खाली घसरले आहे. त्यामुळे यंदा घसरलेली मतदानाची टक्केवारी कुणाला तारून नेणार आणि कुणाला मारक ठरणार हेच पाहणे महत्वाचे ठरणार आहे. यंदा घसरलेली मतांची टक्केवारी हा मुद्दा पूर्व विदर्भातील या पाचही मतदारसंघात भाजपला चिंतन करण्यास भाग पडणार आहे. एकीकडे मतदानाची टक्केवारी कमी झाली तर ते सत्ताधारी पक्षाला जमेचे ठरते असे एक अनुमान काढले जाते मात्र काही वर्षांचा ट्रेण्ड पाहिला तर त्यात बदल झालेला आहे.

मत विभाजन अनेक ठिकाणी भाजपच्या पथ्यावर पडले असले तरी जर मत विभाजन झाले नसते तर विजयाचे गणित कसे बदलले असते हा भागही विचार करायला लावणारा असाच आहे.पूर्व विदर्भातील रामटेक मतदारसंघात दहाने तर चंद्रपूर मतदार संघात नऊने मतदानाची टक्केवारी खालावली आहे.असेच चित्र नागपूर,गडचिरोली,भंडारा - गोंदिया या मतदारसंघात आहे. त्यामुळे सर्वानाच एकप्रकारे हादरा बसला आहे.महायुतीला पर्यायाने भाजपला ही धोक्याची घंटा ठरते की काय ? या चिंतेने ग्रासल्याची चर्चा आहे. नागपूरमध्ये भाजप व काँग्रेसमध्ये कडवी झुंज असली तरी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा पक्षातून घात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण या मतदारसंघात भाजपला धक्का बसू शकतो असा अहवाल आल्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही लक्ष केंद्रित केले मात्र केंद्रातून गडकरी यांच्याबाबत नाराजी असल्याने किंबहुना रोखठोक भूमिकेमुळे गडकरी यांचा ' वारसा ' रोखण्याचे कारस्थान झाले की नाही हे निवडणुकीनंतर कळेल.

रामटेकमध्ये महायुतीत बाहेरील उमेदवार आणला यावरून फटका बसतो की काय अशी चिन्हे आहेत.खासदार कृपाल तुमाने यांची उमेदवारी कापल्याने त्याचा विपरीत परिणाम कसा होतो याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.विशेष म्हणजे या मतदार संघात बौद्ध समाजाचे साडे सहा लाखांचे मतदान हे निर्णायक ठरणार आहे.त्यामुळे ते काँग्रेसच्या पारड्यात जाते का ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. भंडारा - गोंदिया मतदारसंघात बसपामुळे कुणाचे विजयाचे गणित हुकते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.येथे काँग्रेस विरुद्ध भाजप असा सामना असला तरी दोन्ही उमेदवार एकाच जातीचे हा समान धागा आहे.त्यामुळे येथून कुणाला संधी मिळते हा भाग महत्वाचा आहे.असे असले तरी येथे काँग्रेसची ताकद यंदा भाजपच्या तुलनेत जास्त जाणवली आहे. गतवेळी चंद्रपूर मतदारसंघातून काँग्रेसचा एकमेव खासदार निवडून आला होता.यंदा भाजपने सुधीर मुनगंटीवार यांना आखाड्यात उतरवले असले तरी ग्रामीण भागात काँग्रेसने मुसंडी मारलेली आहे.भाजप केवळ शहरी भागापुरता मर्यादित राहिल्याने मुनगंटीवार पराभवाच्या छायेत असल्याचा ठाम दावा राजकीय अभ्यासकांचा आहे. त्याला कारण येथे एम आय एम ने उमेदवार दिला नाही.त्यात भाजपची बी टीम हा शिक्का एम आय एम वर आहे.त्यामुळे आपसूक मुस्लिम समाजाची एक गठ्ठा मते ही काँग्रेसला निर्णायक ठरणार आहेत.असे निरीक्षण राजकीय अभ्यासकांचे आहे. त्यातही २०१४ व २०१९ च्या तुलनेत यंदा मागासवर्गीय, मुस्लिम तसेच झोपडपट्टी भागातील मतदार मोठ्या प्रमाणावर मतदानासाठी बाहेर पडल्याने संविधान बचाव मोहीम काँग्रेसच्या पथ्यावर पडणार आहे.असे असले तरी पूर्व विदर्भातील शहरी भागात भाजप तर ग्रामीण भागात काँग्रेस हे दोन्ही पक्ष जोरात चालले.त्यामुळे प्रत्यक्षात मतदारांनी कुणाला तारले आणि कुणाला गोत्यात आणले हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे. तूर्तास मतदानाचा घटलेला टक्का हा भाजपला धडकी भरवणारा ठरला आहे.

# राहुल गांधी यांचा लातुरात अचानक मुक्काम : सोलापूरच्या सभेहून परतण्यास उशीर



**लातूर :** सोलापूर येथील बुधवारची सभा आटोपूनकाँग्रेसनेतेराहुल गांधी हेलिकॉप्टरने लातूरच्या विमानतळावर सायंकाळी ६.५० वाजता पोहोचले. परंतु, येथील विमानतळावरून रात्रीच्या वेळी विमान उड्डाणाची सुविधा नसल्याने त्यांचा लातुरात अचानक मुक्काम झाला. नियोजित दौऱ्यानुसार दुपारी ३ वाजता लातूर विमानतळावर पोहोचण्याची वेळ निर्धारित होती. परंतु, त्यांचे विमान दुपारी ४.३० वाजता पोहोचले. त्यानंतर ते हेलिकॉप्टरने सोलापूरकडे सभेसाठी रवाना झाले. सोलापूरलाही विमानतळाचे काम सुरू असल्याने त्यांचा दौरा लातूरमार्गे ठरला होता.

**वैमानिक म्हणाले जोखीम नको...**

नियोजित वेळेपेक्षा उशिराने त्यांचा परतीचा प्रवास सोलापूरमधून हेलिकॉप्टरने सुरू झाला. सायंकाळी उशिरा ते लातूरला पोहोचले. ठरल्याप्रमाणे ते विमानाने दिल्लीला जाणार हे निश्चित असताना वैमानिकाने अंधार पडल्यामुळे जोखीम नको, असे स्पष्ट सांगितले. परिणामी, लातुरात अचानक मुक्काम घडला.हॉटेलवर भोजन, विश्रांती...

मुक्काम ठरल्यानंतरराहुल गांधीकारने विमानतळावरून जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील हॉटेलमध्ये मुक्कामाला आले. त्यांच्यासमवेत माजी मंत्री आ. अमित देशमुख होते. हॉटेलमध्ये आल्यानंतर त्यांनी भोजन घेऊन विश्रांती केली. दरम्यान, ते गुरुवारी सकाळी लवकर दिल्लीकडे रवाना होतील, असे सूत्रांनी सांगितले.



# कोल्हापूर शहराला वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले

**कोल्हापूर :** कोल्हापूरशहरात आज, बुधवारी सायंकाळी मेघ गर्जना, वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने अक्षरशा झोडपून काढले. करवीर पंचायत समिती परिसरात जैन बोर्डिंग येथे दुचाकीवर झाड कोसळल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. वीजेच्या गर्जनेसह झालेल्या पावसाने उष्म्याने हैराण झालेल्या कोल्हापूरकरांना सुखद गारवा मिळाला.

गेली दोन दिवस जिल्ह्यात पावसाचे वातावरण राहिले. ढगाळ वातावरणामुळे पारा कमी झाला असला तरी उष्मा वाढला होता. सकाळी आठ पासूनच अंगाकडून घामाच्या धारा वाहत होत्या. बुधवारी दुपारपासून जिल्ह्यात पावसाचे वातावरण झाले. सायंकाळी सहा वाजता आकाशात मेघ गर्जनेसह सोसाट्याचे वारे सुरु झाले.

सुरुवातीला हलक्या सरी कोसळल्या मात्र, त्यानंतर जोरदार पाऊस झाला. कोल्हापूरचे तापमान३९ डिग्रीपर्यंत पोहचल्याने उष्म्याने अंगाची लाहीलाही होत आहे. या पावसाने कोल्हापूरकरांना सुखद गारवा मिळाला.

सोसाट्याचा वारा सुरु झाल्यानंतर कोल्हापूर शहरासह उपनगरातील वीज गायब झाली. तब्बल दीड-दोन तास नागरिकांना अंधारातच रहावे लागले.

वारे एवढे जोरात होते, रस्ते, इमारतीचे टेरीस वरील कचरा लोट आकाशात पसरले होते.

# सांगलीतून उन्हाळी पर्यटनासाठी रेल्वेकडून अनेक गाड्या

**सांगली:** उन्हाळी सुट्यांचा आनंद घेऊ पाहणाऱ्यासांगलीकरांसाठीआतारेल्वेच्यामाध्यमातून अनेक गाड्या उपलब्ध झाल्या आहेत. सुट्यांच्या हंगामात तिकिटांची उपलब्धताही झाली आहे.

देशभरातील अनेक चांगल्या ठिकाणांना भेटी देण्यासाठी रेल्वेचा पर्याय सांगलीकरांना मिळाला आहे. वडोदरा येथील स्टॅच्यू ऑफ युनिटी हा जगातील सर्वात उंच पुतळा पाहण्यासाठी जाऊ पाहणाऱ्या प्रवाशांसाठी मे महिन्यापासून म्हैसूर-उदयपूर पॅलेस क्वीन ही गाडी उपलब्ध आहे. या गाडीतून उदयपूर, चितोडगडलाही जाता येते. कर्नाटकातील दांडेली अभयारण्य, श्रवणबेळगोळ, धारवाड, हुबळी, चिकमंगळूर हिलस्टेशन तसेच बंगळुरु जवळील महालक्ष्मीचे सुवर्ण मंदिर पाहण्यासाठी सांगली स्थानकावरून सांगली-बेंगलोर राणी चन्नम्मा एक्स्प्रेसची तिकिटे उपलब्ध आहेत.

सांगली-परळी वैजनाथ डेमू एक्स्प्रेस रेल्वे गाडी पकडून तुळजापूर (उस्मानाबाद-धाराशिव स्टेशन), अक्कलकोट (कुर्डूवाडी स्टेशन), पंढरपूर विठ्ठल मंदिर, औसा किल्ला, हत्ती बेट, गंज गोलाई, जगदंबा मंदिर व खरोसा गुफा (लातूर) याठिकाणी भेटी देता येऊ शकतात.

## प्रवाशांची सोय; 'या'ठिकाणी देता येतील भेटी




### प्रवाशांना दिलासा

**सांगली व परिसरातील गावे व शहरांमधील प्रवाशांना उन्हाळी सुटीतीलपर्यटनासाठीसांगली स्थानकावरून अनेक गाड्यांचे पर्याय मिळाले आहेत. प्रवाशांनी सांगलीतून प्रवास करावा. उन्हाळी सुट्यांमध्ये रेल्वे गाड्यांचे बुकिंग जलदगतीने फुल्ल होते. त्यामुळे आताचपर्यटनाचेनियोजन रेल्वेच्या माध्यमातून करावे, असे आवाहन रेल्वे डेव्हलपमेंट ग्रुपचे रोहित गोडबोले यांनी केले आहे.**

# ग्रामीण साहित्यातील 'वसंत' सरला

## ज्येष्ठ साहित्यिक वसंत केशव पाटील यांचे निधन

**सांगली :** सांगलीचे सुपुत्र व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक वसंत केशव पाटील यांचे (वय ७९ )

वसंत केशव पाटील यांचे मूळ गाव कुमठे (ता. तासगाव, जि. सांगली) आहे. रयत शिक्षण संस्थेतून शिक्षक म्हणून सेवा सुरू केली आणि हिंदी विषयाचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले. ग्रामीण मराठी व हिंदी साहित्यात त्यांनी मोठे योगदान दिले. मूळ हिंदी लेखक डॉ. हरिवंशराय बच्चन यांच्या 'दशव्दार ते सोपान ' या आत्मचरित्राच्या मराठी अनुवादासाठी वसंत केशव पाटील यांना १९९६ साली साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

याशिवाय त्यांना राज्य सरकारकडून साहित्य निर्मितीचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत.



यशवंतराव: विचार आणि वारसा, छप्पर, आधुनिक शिक्षा शिल्पी : कर्मवीर भाऊराव पाटील, कंदिलाचा उजेड, सहीमागाचा माणूस असे त्यांनी कादंबरी, कथा, अनुवाद व कविता यामध्ये विपुल लेखन केले.

'केशवसुतांच्या निवडक कविता' असे नवे पुस्तक त्यांचे प्रकाशनाच्या मार्गावर होते.

# अकोला मार्गे पुरी-उधना-पुरी उन्हाळी विशेष रेल्वेच्या ३४ फेऱ्या

**अकोला :** उन्हाळी सुट्यांमध्ये होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता दक्षिण पूर्व मध्य रेल्वेने २५ एप्रिल ते २८ जून या कालावधीत पुरी-उधना-पुरी द्विसाप्ताहिक उन्हाळी विशेष एक्स्प्रेस सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आठवड्यातून दोन दिवस धावणाऱ्या या विशेष एक्स्प्रेसच्या अप व डाऊन मार्गावर प्रत्येकी १७ अशा एकूण ३४ फेऱ्या होणार असून, अकोला स्थानकावर थांबा असल्याने अकोलेकर प्रवाशांची सोय झाली आहे.



दक्षिण पूर्व मध्य रेल्वेने जारी केलेल्या पत्रकानुसार, गाडी क्र. ०८४७१ पुरी-उधना विशेष एक्स्प्रेस २५ एप्रिल ते २७ जून या कालावधीत दर सोमवार व गुरुवारी पुरी स्थानकावरून सकाळी ६:३० वाजता रवाना होऊन दुसऱ्या दिवशी १४:०० वाजता उधना स्थानकावर पोहोचणार आहे. ही गाडी मंगळवार व शुक्रवारी सकाळी ६:१३ वाजता अकोला स्थानकावर येणार आहे.

परतीच्या प्रवासात ०८४७२ उधना-पुरी विशेष एक्स्प्रेस २६ एप्रिल ते २८ जून या कालावधीत दर मंगळवार व शुक्रवारी उधना स्थानकावरून सायंकाळी १७:०० वाजता रवाना होऊन दुसऱ्या दिवशी रात्री २२:४५ वाजता पुरी स्थानकावर पोहोचणार आहे. ही गाडी त्याच रात्री ००:५० वाजता अकोला स्थानकावर येणार आहे.

या ठिकाणी थांबा

अप व डाऊन मार्गावरील या विशेष एक्स्प्रेसला महाराष्ट्रात गोंदिया, नागपूर, वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाळधी, अमळनेर, नंदुरबार या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

# त्या आकाशाचे नाव लता मंगेशकर

## अमिताभ बच्चन यांनीलता मंगेशकर पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केली भावना

**मुंबई :** माझ्या वडीलांना जेव्हालता मंगेशकरांबाबतविचारले तेव्हा ते केवळ 'शहद की धार' इतकेच म्हणाले. त्यांच्या गायनात मधाचा गोडवा होता. जशी मधाची लय कधी तुटत नाही, तसा त्यांचा सूर कधी तुटला नाही.लता मंगेशकरांचास्वर आत्म्याला परमात्म्याशी जोडणारा धागा आहे, असे म्हणतअमिताभ बच्चनयांनी 'त्या आकाशाचे नाव लता मंगेशकर...' अशी शब्दरचना असलेली 'आकाशाची सावली' ही मराठी कविता वाचून उपस्थितांची मने जिंकली. लता मंगेशकर पुरस्कार स्वीकारल्यानंतर ते बोलत होते.विले पार्ले येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहामध्ये मा. दीनानाथ मंगेशकर यांच्या ८२ वा पुण्यतिथी सोहळ्यात मा. दीनानाथ मंगेशकर व लता मंगेशकर पुरस्कार प्रदान करण्यात आले.अमिताभ बच्चनयांना लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. इतका मोठा पुरस्कार मिळणे




ही सौभाग्याची गोष्ट असल्याचे सांगत अमिताभ म्हणाले की, मी कधीच स्वत:ला या पुरस्कारसाठी योग्य मानले नाही. हृदयनाथ मंगेशकरांनी मागच्या वर्षीसुद्धा बोलावले होते, पण मी तब्बेत ठिक नसल्याचे सांगितले. खरे तर मी चांगला होतो, पण मला यायचे नव्हते. या वर्षी माझ्याकडे कोणते कारण नसल्याने त्यांचे आमंत्रण स्वीकारावे लागले. लताजींनी माझ्या कुटुंबावर नेहमीच प्रेम केले. त्यांच्याकडून आम्हाला मिळालेल्या आदराचे वर्णन शब्दांत करू शकणार नाही. १९८१मध्ये त्यांच्याच प्रेरणेमुळे मी कार्यक्रम करू लागलो. एकदा मी न्यूयॉर्कमध्ये असताना तिथे लताजींनी मला भेटायला बोलावले. तिथल्या मोठ्या हॉलमध्ये त्यांचा कार्यक्रम होणार होता. तिथे त्यांनी मला एक सादरीकरण करायला सांगितले. मला काही समजले नाही, पण त्या लता मंगेशकर असल्याने मी त्यांचे म्हणणे मान्य केले. त्या म्हणाल्या की, तुम्ही एका चित्रपटात गाणे गायले आहे. त्या 'लावारीस' चित्रपटातील 'मेरे अंगने में...' गाण्याबद्दल बोलत होत्या. त्यांच्या आग्रहाखातर मी त्या शोमध्ये गाणे गायले. लोकं अक्षरश: नाचू लागले. माझ्या मित्रांनी ते पाहिले आणि माझे कार्यक्रम सुरू झाले. त्यामुळे माझ्या कार्यक्रमांचे श्रेय लता मंगेशकरांना जाते.मराठी... मराठी...

एका कार्यक्रमात मी हिंदीत बोलत असताना मागून आवाज आला की, ए मराठी... मराठी... तेव्हा मी हात जोडून त्यांची क्षमा मागितली आणि मराठी शिकत असल्याचे सांगून स्वत:चा बचाव केला. या गोष्टीला १०-१२ वर्षे झाली, पण अद्याप मी मराठी शिकू शकलो नाही. पूर्वी वेळ मिळाला नाही, पण आता वृद्धावस्थेत वेळ मिळत असल्याने मराठी शिकण्याचा प्रयत्न करत असल्याचेही अमिताभ म्हणाले.या सोहळ्यात गायक रुपकुमार राठोड यांना प्रदीर्घ संगीत सेवेसाठी मा. दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात आले. इतर मा. दीनानाथ मंगेशकर पुरस्कारांमध्ये संगीतकार ए. आर. रहमान यांना दीर्घकाळ संगीत सेवेसाठी, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना नाट्य-सिनेसृटीतील प्रदीर्घ सेवेसाठी, अभिनेत्री पाद्मिनी कोल्हापुरे यांना सिनेसृष्टीतील प्रदीर्घ सेवेसाठी, भाऊ तोरसेकर यांना प्रदीर्घ पत्रकारितेसाठी, अभिनेता अतुल परचुरेला प्रदीर्घ नाट्य सेवेसाठी, अभिनेता-दिग्दर्शक रणदीप हुड्डा यांचा उत्कृष्ट चित्रपट निर्मितीसाठी विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. २०२३-२४ वर्षातील उत्कृष्ट नाटक निर्मितीसाठी दिला जाणारा मोहन वाघ पुरस्कार 'गालिब' या मराठी नाटकाला देण्यात आला. समाजसेवेसाठी दीपस्तंभ फाउंडेशन मोनोबल या संस्थेला आशा भोसले यांच्यातर्फे आनंदमयी पुरस्कार प्रदान करण्यात आला. मंजिरी फडके यांना प्रदीर्घ साहित्य सेवेसाठी वाग्विलासीनी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# आतापर्यंत ३ हजार ५६९ कोटींचा महसूल जमा

**मुंबई :** २५ मेपर्यंत मालमत्ता कर वसुलीचे उद्दीष्ट गाठण्यासाठी मुंबई महापालिका आटोकाट प्रयत्न करत आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी ४ हजार ५०० कोटी रुपये कर जमा करण्यासाठी पालिका प्रयत्नशील असून २३ एप्रिलपर्यंत ३ हजार ५६९ कोटी रूपयांच्या मालमत्ताकराचे संकलन झाले आहे. निर्धारित लक्ष्य ४ हजार ५०० कोटी रुपयांच्या तुलनेत हे प्रमाण ७९ टक्के इतके आहे. एक महिन्याच्या कालावधीत १०० टक्के कर संकलन करण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे.महानगरपालिका हद्दीत एकूण मालमत्तांची संख्या ९ लाख ५५ हजार ३८ इतकी आहे. त्यापैकी ५०० चौरस फूट (४६.४५ चौरस मीटर) व त्यापेक्षा कमी चटईक्षेत्र असणाऱ्या निवासी इमारती / निवासी सदनिकांना संपूर्ण मालमत्ता करातून सूट देण्यात आली आहे. या मालमत्तांची संख्या ३ लाख ५६ हजार ६५२ आहे. एकंदरीत ५ लाख ९८ हजार ३८६ मालमत्ता कर आकारणी कक्षात येतात. मालमत्ता कराच्या उद्दिष्टपूर्तीसाठी करनिर्धारण व संकलन विभागाने मुंबई शहर आणि उपनगरांमधील मोठ्या थकबाकीदारांवर लक्ष केंद्रीत केले आहे.'कर भरा, कारवाई टाळा'

अनेक मालमत्ताधारकांनी २५ मेपूर्वी कर भरण्याचे आश्वासन दिल्याचे पालिकेच्यावतीने सांगण्यात आले. एप्रिल आणि मे २०२४ मध्ये संकलित होणारा मालमत्ताकर हा सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षातील उद्दिष्टांचाच भाग आहे. अद्यापही करभरणा न केलेल्या मालमत्ताधारकांनी वेळीच कर जमा करुन दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन पालिकेने केले आहे.'टॉप टेन' मालमत्ताधारकबॉम्बे ऑक्सिजन लिमिटेड - (टी विभाग) - ६८ कोटी ८८ लाख १ हजार ७७८ रुपये (चार मालमत्ता)

ॲ रिस्टो शेल्टर प्रा. लि. (एम पूर्व विभाग) - २० कोटी ४१ लाख ६२ हजार ९ हजार ०७६ रुपये

मेसर्स फोरमोस्ट रिॲलेटर्स प्रा लि.(एच पूर्व विभाग) - १५ कोटी ७५ लाख ७४ हजार २०७ रुपये

श्री साई गृप ऑफ कंपनीज (के पश्चिम विभाग) - १४ कोटी २२ लाख ८० हजार ८७४ रुपये

गौरव इन्वेस्टमेंट (जी दक्षिण विभाग) - १४ कोटी १६ लाख ३१ हजार ४८९ रुपये

मेसर्स पुरी कन्स्ट्रक्शन लि. (ए विभाग) - १३ कोटी ८३ लाख ९१ हजार ७४४ रुपये

स्नेहयोगी सहकारी गृहनिर्माण संस्था (एच पश्चिम विभाग) - १३ कोटी ७२ लाख ८२ हजार ०९९ रुपये

सुमेर कॉर्पोरेशन (एल विभाग) - १३ कोटी ०८ लाख ८३ हजार २२७ रुपये

लॅण्डमार्क डेव्हलपर्स (एफ दक्षिण विभाग) - १२ कोटी १२ लाख ७१ हजार ३०० रुपये

श्री साई पवन सहकारी गृहनिर्माण संस्था (के पश्चिम विभाग) - ८ कोटी ७३ लाख ३३ हजार १११ रुपये

नरेंद्र मोदी यांच्या प्रचाराच्या कार्यक्रमात बदल

# ३० ऐवजी २९ मे रोजी होणार कराडमध्ये सभा

**सातारा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कराडमध्ये होणाऱ्या सभेत बदल करण्यात आलेला आहे . जी सभा ३० एप्रिल रोजी होणार होती ती आता २९ एप्रिल रोजी सोमवारी सैदापूर येथे दुपारी दोन वाजता होणार आहे पुणे व बारामती येथील सभांची कार्य व्यस्तता लक्षात घेऊन हा बदल करण्यात आलेला आहे सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे यांच्या अध्यक्षतेखाली या सभेचे नियोजन करण्यात येत आहे.



खासदार उदयनराजे भोसले यांच्या प्रचारासाठी नरेंद्र मोदी येत असून संपूर्ण सातारा जिल्ह्यासह महाराष्ट्राचे लक्ष नरेंद्र मोदी यांच्या सभेकडे लागून राहिले आहे. सातारा लोकसभा मतदारसंघात भाजपचे उदयनराजे भोसले विरुद्ध राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांच्यात चुरशीची लढत होत आहे भारतीय जनता पार्टीने उदयनराजे भोसले यांचा प्रचार जोरदार व्हावा यासाठी महायुतीचे स्टार प्रचारक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विशेष सभेचे आयोजन केले आहे . सैदापूर येथील सभेस एक लाखापेक्षा अधिक लोक येतील असे नियोजन केले आहे. मात्र ही सभा दुपारी दोन वाजता असल्याने दुपारच्या रणरणत्या उन्हाची झळ बसण्याची शक्यता आहे. २०१९ च्या पोटनिवडणुकीत खासदार उदयनराजे भोसले यांच्या प्रचारासाठी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी साताऱ्यात आले होते . त्यावेळी ही सभा येथील सातारा सैनिक स्कूलच्या मैदानावर झाली होती.

राज्यसभेत चे खासदार असणारे उदयनराजे लोकसभेसाठी पुन्हा रणांगणात उतरले आहे त्यामुळे उदयनराजेंसाठी सातारकरांना साद घातली जाणार आहे त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी सभेत काय बोलणार? हा उत्सुकतेचा विषय आहे. पुणे आणि बारामती या सभांची वेळ व प्रवासाचे अंतर या गोष्टी लक्षात घेऊन ३० एप्रिल ऐवजी २९ एप्रिल रोजी ही सभा होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पालकमंत्री शंभूराज देसाई तसेच भाजप कार्यकारिणीचे निवडणूक प्रभारी अतुल भोसले प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर इत्यादी मान्यवरांनी सैदापूर येथील सभास्थळाची पाहणी केली आहे. पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा लक्षात घेऊन तेथे एक सीआरपीएफ कंपनी तसेच जलद प्रतिसाद पथक आणि साडेसातशे पोलिसांचा बंदोबस्त तैनात केला आहे.

## सुप्रसिद्ध फिजिशियन डॉ. रवींद्र हर्षे यांचे निधन



**सातारा :** आयुर्वेदिक अर्कशाळा लिमिटेड सातारा या कंपनीचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक सुप्रसिद्ध फिजिशियन डॉ. रवींद्र हर्षे ( ८१) यांचे दुर्धर आजाराने सांगली येथे निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. २४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता संगम माहुली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी , मुलगा मुलगी असा परिवार आहे.

जुन्या काळातले सातारचे प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ म्हणून ते ओळखले जात. गोरगरिबांपासून ते अगदी राजकीय नेत्यांपर्यंत त्यांच्याकडे अनेक जण वैद्यकीय सल्ल्यासाठी येत असत. अत्यंत शांत मनमिळावू आणि कायम गरीब रुग्णांना मदत करणारे डॉक्टर अशी त्यांची ख्याती होती. एक अतिशय विनम्र व तितकाच ताकतीचा डॉक्टर हरपला असल्याची भावना सातारकरांनी व्यक्त केली आहे.

## मसूरला महालक्ष्मी व सटवाई देवी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना समारंभ

**मसूर :** जागृत देवस्थान श्री महालक्ष्मी व श्री सटवाई देवी मंदिराचा जिर्णोद्धार व मंदिरात मूर्ती व प्राणप्रतिष्ठापना, कलशारोहण समारंभ शुक्रवार २६ रोजी श. भ्र. भीष्मानंद सरस्वती महाराज दत्तनगर यांच्या शुभहस्ते होत आहे.

मसूर येथे पुरातन काळातील ७०० वर्षांपूर्वीचे जुन्या बांधकामाचे श्री महालक्ष्मी व श्री सटवाई देवी मंदिर होते. देवस्थान जागरूक व नवसाला पावणारे अशी ख्याती असल्याने या पुरातन मंदिराचा जिर्णोद्धार ग्रामस्थांनी लोकसहभागातून पूर्णत्वास नेला.

सर्वप्रथम गुरुवार २५ एप्रिलला सायंकाळी ४ ते ९ वाजता मूर्ती व कलश रथयात्रा ग्राम प्रदक्षिणा घालण्यात येणार आहे. शुक्रवारी २६ एप्रिलला सकाळी ९ पासून श्री गणेश पूजन मूर्ती पूजन कलशस्नान, होम हवन आदी धार्मिक कार्यक्रम विजय जंगम स्वामी यांच्या हस्ते होणार आहे. ११ ते १ श्रींची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण. सायं. ५ नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.




या धार्मिक कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

## विखळे येथे आज महासत्संग मेळाव्याचे आयोजन

**मायणी :** श्री गुरुदेव दत्त अध्यात्मिक विकास सेवा केंद्र पुणे यांच्या विद्यमाने ऑनलाइनच्या माध्यमातून स्वामी श्री गुरुदत्त भक्त परिवार विखळे ता. खटाव येथे गुरुवार २५ एप्रिल रोजी भव्य दिव्य महासत्संग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र परिवार, विखळे यांनी दिली.

महासत्संग मेळाव्यात पुढील बाबींवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे -दैनंदिन मानवी जीवनातील समस्या, दत्तप्रणाली आणि त्यांच्या अवतार कार्याचे प्रमुख वैशिष्ट्य, दैवी सकारात्मक ऊर्जा मार्गदर्शन ,मानवी जीवनातील विविध समस्यांवर समाधान, राष्ट्रकल्याणार्थक समस्त देवतांची सेवा व त्यावर मार्गदर्शन ,मानवी जीवनातील विविध समस्यांचे समाधान ,राष्ट्र कल्याणार्थ समस्त देवतांची सेवा , मानवी जीवनातील कुलदेवी ,कुलदैवत व पितरांचे महत्त्व , बाल संस्कार आणि युवा संस्कार आधारित अध्यात्मिक मार्गदर्शन, भारतीय अध्यात्मिक संस्कृतीमध्ये ध्यानाचे महत्त्व ,सनातन हिंदू धर्म संस्कृतीचे महत्त्व ,भारतीय संस्कृतीमधील चार पुरुषार्थ यांचे मानवी जीवनात असणारे विशेष महत्व

याप्रसंगी सकाळी ६ ते १० भैरव चंडी .सकाळी १० ते ११ श्री स्वामी समर्थ महाराजांचा पालखी सोहळा ,दुपारी १२.३० ते २ अविनाश दादा यांचे मार्गदर्शन. दुपारी २ ते ४ महाप्रसाद तरी या कार्यक्रमाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अनधिकृत प्रवेश केल्याने सहा जणांवर गुन्हा

**राजदंड / सातारा**

पिरवडी येथील न्यू गुलमोहर सहकारी गृहनिर्माण संस्थामधील प्लॉट नंबर ४७ ही मिळकत न्यायालयाच्या आदेशानुसार सील केली आहे. तरीही आदेशाचे उल्लंघन करत साजीद अल्हामद शेख, अल्हामद नुरुल हसन शेख, राशिद अल्हामद शेख, गाजीया शेख, नाजिया शेख (सर्व रा. सातारा) यांनी मिळकतीचे सील केलेले कुलूप तोडून अनधिकृतपणे प्रवेश केला.

हा प्रकार दि. २२ रोजी दुपारी १२.३० वाजता घडला.

या प्रकरणी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनीचे शाखा अधिकारी प्रकाश तानाजी बाबर यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# नागरिकांना पुरेसे पाणी द्या, अन्यथा प्राधिकरणाला टाळे ठोकू

■ फिरोज पठाण व विलासपूर येथील नागरिकांचा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना घेराव

**सातारा :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने विलासपूर गोळीबार मैदान इंदिरानगर वसाहत येथे पुरेशा दाबाने पाणी येत नाही. यामुळे ऐन उन्हाळ्यात नागरिकांना तीव्र पाण्याची टंचाई जाणवत आहे त्यामुळे आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या समर्थक फिरोज पठाण आणि येथील नागरिकांनी सोमवारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला. पुरेशा प्रमाणात पुरेशा दाबाने पाणी द्या अन्यथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला टाळे ठोकू असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.



यावेळी पाण्याच्या मुद्द्यावरून अधिकारी आणि नागरिक यांच्या जोरदार वादावादी झाली. सातारा शहराच्या पूर्वेला हद्दवाढ क्षेत्रात नव्याने समाविष्ट झालेल्या विलासपूर गोळीबार मैदान वसाहत तसेच इंदिरानगर वसाहत येथे गेल्या दोन महिन्यापासून पुरेशा प्रमाणात पाणी येत नाही .इंदिरानगर वसाहतीमध्ये पाच लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी असून तेथे सुद्धा पाणी येत नाही, त्यामुळे नागरिकांना गेल्या दोन महिन्यापासून केवळ टँकरचाच आधार आहे पाण्याच्या टंचाईची ही बाब लक्षात आल्यानंतर आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी समर्थक फिरोज पठाण यांना या संदर्भात तातडीने लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या होत्या. फिरोज पठाण यांच्या समवेत नागरिकांनी दुपारी साडे अकराच्या दरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अभियंता गडकरी मॅडम यांच्याशी चर्चा केली मात्र संवादापेक्षा विसंवाद झाल्यानेच उभयतांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंजूर करून आणलेल्या ३६ कोटी रुपयांच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेची कामे सुरू आहेत मात्र नागरिकांना पाणी कोठे आहे? हद्दवाढ क्षेत्रामध्ये टँकरचा प्रस्ताव तुम्ही जिल्हाधिकाऱ्यांना दिला का असा रोखठोक सवाल फिरोज पठाण यांनी केला तसेच शिंदे नावाचे अभियंता मनमानी कोणालाही कसेही नळ कनेक्शन वाटप करत असतात त्यामुळे प्रत्यक्षात जे गरजू नागरिक आहेत त्यांना दोन दोन वर्ष मागणी करूनही नळ कनेक्शन मिळत नाही.

प्राधिकरणाचा हा भोंगळ कारभार नागरिकांना त्रासाचा ठरला आहे त्यामुळे तातडीने नागरिकांना पुरेसे आणि पुरेशा दाबाने पाणी द्या अन्यथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयाला टाळे ठोकू आणि पवई नाक्यावर रास्ता रोको करू त्यासाठी माझ्यावर गुन्हे दाखल झाले तरी चालतील असा थेट इशारा फिरोज पठाण यांनी दिला.

# केंद्र व राज्य सरकारच्या हुकूमशाही कारभाराला जनता कंटाळली

महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार शशिकांत शिंदे यांचे प्रतिपादन; कोरेगाव येथे प्रचाराचा भव्य शुभारंभ

**कोरेगाव :** केंद्रात आणि राज्यात सरकारची सर्वत्र हुकूमशाही सुरू असून सर्वसामान्यांची गळचेपी केली जात आहे. सर्वसामान्य जनता आता पेटून उठली असून भाजपच्या चारसो पारच्या घोषणेला पूर्णपणे कंटाळली आहे. देशात २३० च्या वर सुद्धा भाजप जाऊ शकणार नाही. सर्वत्र परिवर्तनाची लाट आहे, महाराष्ट्रात देखील महाविकास आघाडी नेत्रदीपक यश मिळेल. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची कर्मभूमी असलेल्या सातारा जिल्ह्यातून सर्वसामान्यांची तुतारी निश्चितपणे संसदेत वाजेल, असा विश्वास माजी मंत्री आमदार शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केला.

सातारा लोकसभा मतदारसंघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. शशिकांत शिंदे यांच्या कोरेगाव शहरातील प्रचाराचा शुभारंभ रविवारी सकाळी साडेदहा वाजता ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिराच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. विजयराव कणसे, तालुकाध्यक्ष एडवोकेट श्रीकांत चव्हाण, पंचायत समितीचे माजी सभापती संजय झंवर, माजी सदस्य प्रतिभाताई बर्गे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भास्कर कदम, किशोर नानासाहेब बर्गे, शिवसेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख दिनेश बर्गे, तालुकाप्रमुख सचिन झांजुर्णे, शहरप्रमुख अक्षय बर्गे,



अमरसिंह बर्गे, नगरसेवक प्रीतम बर्गे, गणेश धनावडे, नवनाथ बर्गे यांच्या सहप्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार शशिकांत शिंदे यांनी तडाखेबंद भाषण करत विरोधकांवर जोरदार टीका केली. मी जर मुंबई बाजार समितीत घोटाळा केला असता तर आज हितं दिसलो नसतो मी अन्य घोटाळेबाजांप्रमाणे भाजपमध्ये गेलो असतो, अशी कोपरखळी मारत आमदार शशिकांत शिंदे यांनी गल्लीपासून दिल्लीपर्यंत सुरू असलेल्या भाजपच्या हुकूमशाही कारभाराचा पर्दाफाश केला. सर्वसामान्य जनता महिला आणि युवकांनी ही निवडणूक हातात घेतली असून पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशात महाविकास आघाडीला प्रचंड पाठिंबा मिळत आहे. कोणत्याही परिस्थितीत भाजप या निवडणुकीत यश मिळवणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी ॲड. विजयराव कणसे, दिनेश बर्गे, प्रतिभाताई बर्गे, संजय पिसाळ, सी. आर. बर्गे, पी. एस. पवार सर, अमरसिंह बर्गे, प्रीतम बर्गे, अशोक भोसले आदींसह मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. गणेश होळ यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. किशोर नानासाहेब बर्गे यांनी आभार मानले. यावेळी विविध पक्ष संघटना आणि आघाडीच्या वतीने आमदार शशिकांत शिंदे यांच्या उमेदवारीला पाठिंबा देणारी पत्रे देण्यात आली. कार्यक्रमास इंडिया महाविकास आघाडीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## देशात हुकूमशाहीची सत्ता

(पान १ वरून)

पी. व्ही. नरसिंहराव, एच. डी. देवेगौडा यांसह अनेकांनी देशाचा विचार केला; परंतु नरेंद्र मोदी हे देशाचा विचार न करता लोका-लोकांमध्ये संघर्ष कसा वाढेल, याची काळजी घेतात, असा गंभीर आरोप करीत पवारांनी मोदीच्या कार्यप्रणालीवर हल्ला चढवला.

देशाला संकटातून वाचवण्यासाठी महाविकास अघाडीच्या उमेदवाराला विजयी करण्याचे यावेळी पवारांनी आवाहन केले.

यावेळी माजी मुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील, उत्तमराव जानकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे, विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, शिवाजीराजे कांबळे, दादासाहेब साठे, ताई साठे, नलिनीताई चंदेले, बाळासाहेब पाटील, गणेश पाटील, भारत पाटील, दत्ताजी गवळी, मधुकर देशमुख, सौदागर जाधव, संजय पाटील, संदीप साठे, औदुंबर महाडिक, संजय पाटील घाटणेकर, संजय कोकाटे, दत्ताजी गवळी, सौदागर जाधव, आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक हरिदास रणदिवे यांनी केले तर आभार औदुंबर महाडिक यांनी मानले.

सभेस हजारो नागरिक उस्फूर्तपणे उपस्थित होते.

## कोल्हापुरात शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींची अतिविराट सभा

(पान १ वरून)

विजय जाधव, पी. जी. शिंदे, अशोकराव चराटी, डॉ. संजय पाटील, बाबासाहेब पाटील, एम. पी. पाटील, संतोष धुमाळ, सोमनाथ घोडेराव आदी प्रमुख उपस्थित होते. पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नावर मंत्री मुश्रीफ म्हणाले, वैयक्तिक बदनामी, वादग्रस्त वक्तव्ये आणि चुकीचे आरोप यासारखे मुद्दे टाळले पाहिजेत. आरोप- प्रत्यारोपामुळे या बाजूकडून शाहू महाराज छत्रपती यांच्यावर टीका होईल, असेच हे षडयंत्र दिसते. कोणाशी काही जर धमकीसारखा चुकीचा प्रकार असेल तर संबंधितांनी पोलिसात जाऊन तक्रार द्यावी. त्यासाठी हातात काठी घेऊन बसण्याची काय गरज आहे.? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभेच्या नियोजनाच्या बैठकीत पालकमंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक, खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर, समरजीत घाटगे, आदी प्रमुख उपस्थित होते.

पान १ वरून

## संजयकाकांच्या समोर नाराजीचा 'अंडर करंट'

जगताप, पृथ्वीराज देशमुख, गोपीचंद पडळकर, सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, अशा महत्वाच्या नेत्यांशी असणाऱ्या शीत युद्धातून जिल्हाभर नाराज गटाचा अंडरकरंट दुसरं करताना भाजपच्या पक्षश्रेष्टीनाही आता त्रास होऊ लागला आहे, ही नाराजी दूर करताना मोदींसाठी आता सगळं विसरा अशी गळ घालून मत मागा असा आदेश देण्यात आलेला आहे.

■ **दुष्काळी फोरमची साथ सुटली**

दुष्काळी भागातील प्रश्नांसाठी दबावगट म्हणून स्थापन झालेल्या दुष्काळी फोरमच्या नेत्यांना सध्या राजकीयदृष्ट्या सुकाळ निर्माण झाला होता. जिल्ह्यातील अनेक निवडणुका, संस्थात्मक कारभारामध्ये फोरमचा हा दबावगट सध्या प्रभावी ठरला.

संजयकाका यांचा जिल्ह्याच्या राजकारणात दुष्काळी फोरम मधून प्रवेश झाला, खासदार संजय पाटील, आ. विलासराव जगताप, आ. अनिल बाबर, माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, माजी मंत्री अजितराव घोरपडे, राजेंद्रअण्णा देशमुख यांचा समावेश होता, मात्र आता काकांचे यात पूर्वीसारखे सख्य राहिले नाही.

■ **देशमुखांचे ताट दरवेळी दुसऱ्याला**

'' पक्ष आम्ही वाढवायचा आणि फळ दुसऱ्यांनी खायची'' अशी भूमिका भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज देशमुख यांनी घेतली होती, देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची नाराजी काढली असल्याचे समजते, मात्र लोकसभेचा तोंडचा घास गेल्याने त्यांचे कार्यकर्ते नाराज आहेत. पदवीधर निवडणुकीत ऐनवेळी देशमुख यांच्यावर पक्षाने उमेदवार लादली, विधानपरिषद सहा महिने मिळेल इतकी दिली, संग्राम देशमुख यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष पदावरून जिल्हाभर पक्ष बांधणी केली, मात्र त्यांना डावलण्यात आले, तसचे काकांचे सुद्धा देशमुकांच्या बरोबर शीतयुद्ध सुरूच आहे.

■ **बाबरांचे कार्यकर्ते नागेवाडी अजून विसरले नाहीत**

नागेवाडी येथील यशवंत कारखान्याच्या मालकीहक्कावरून खासदार संजयकाका आणि दिवंगत शिवसेना आमदार अनिल बाबर यांच्यात संघर्ष आहे. '' न्यायालयीन लढाई चालू असताना आमदार बाबर यांच्याकडून कुरघोड्या केल्या जात आहेत. त्यामुळे कारखाना आर्थिक संकटांना सामोरं जात असल्याचा आरोप करीत खासदार पाटील यांनी या कुरघोड्या थांबवल्या नाहीत तर, आपणास वेगळा विचार करावा लागेल, असा इशारा अनिल बाबर यांना दिला होता, तर अनिल बाबर यांनी सुद्धा ''काही राजकीय कारणांमुळे कारखान्याचे पुर्नवसन होऊ दिलं नाही. यशवंत सहकारी साखर कारखाना हा सभासदांच्या मालकीचा राहिला पाहिजे, यासाठी माझी लढाई आहे. यामध्ये काय गैर आहे? माझ्यात ताकद असेपर्यंत ही लढाई मी लढतच राहणार आहे.'' असं सांगितलं होते. आता अनिल भाऊंच्या पश्चात लोकसभेसाठी देवेंद्र फडणवीस सुहास बाबर यांना गोंजारत असले तरी कार्यकर्ते जूना संघर्ष विसरतील का ? असा प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला आहे.

## फलटण येथील श्रीराम मंदिरात अनिकेतराजे नाईक निंबाळकरांच्या हस्ते मोहिते पाटलांच्या प्रचाराचा शुभारंभ

डॉ. शेंडे, मार्केट कमिटीचे चेअरमन विजयराव बोरावके, दिलीपसिंह भोसले, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्यासह फलटण व माण विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी रघुनाथराजे नाईक निंबाळकर यांनी नाईक निंबाळकर घराण्याची राजकीय भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, रामराजे व संजीवराजे यांनी आपली संपूर्ण ताकद धैर्यशील मोहिते पाटील यांच्या पाठीशी उभी केली आहे. फलटण ही प्रभू श्रीरामाची नगरी आहे. आम्ही प्रभू श्रीरामाप्रमाणे एक वचनी, एक बाणी आहोत. एकदा वचन दिले ते कधीच मोडणार नाही. फलटण, माण, खटावमधून धैर्यशील भैय्यांना मताधिक्क्य देऊ. यावेळी त्यांनी खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या गुंडगिरी प्रवृत्तीचा खरपूस समाचार घेतला.

## वडिलांनीच दिली मुलाच्या हत्येची ७५ लाख रुपयांची सुपारी

तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला होता.

अरगडे त्यांच्या कार्यालयात आले. काम संपवून ते दुपारी ३ वाजता घरी जाण्यासाठी कार्यालयातून बाहेर पडले. असता त्या वेळी दुचाकीवरून दोघे जण त्याठिकाणी आले. त्यांनी अरगडे यांच्या गाडीजवळ दुचाकी लावली. दुचाकीवरील सहप्रवाशाने पिस्तूल काढून गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, ऐनवेळी पिस्तूल लॉक झाली आणि त्यामुळे त्यांचा डाव फसला. अरगडे यांनी आरडाओरडा केल्याने हल्लेखोर दुचाकीवरून पळून गेले. या संपूर्ण घटनेचा तपास पोलिसांनी केला असता वडिलांनीच संपत्तीच्या वादातून मुलाला जीवे मारण्याचा प्लॅन केला असल्याचे निष्पन्न झाले असून याप्रकरणी ६ जणांना अटक केली आहे.

## निवडणूक आयोगाचा गळा भाजपच्या हाती

परिषदेत ठाकरे बोलत होते. यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, गोपाळ तिवारी, अजित दरेकर,संजय बालगुडे, नीता परदेशी, सुजित यादव, रफिक शेख, श्री पोळेकर, मेहबूब नदाफ, गुलाम हुसेन, राज अंबिके उपस्थित होते.

ठाकरे म्हणाले, लोकसभेसाठी पहिल्या टप्प्यात १०२ जागांसाठी मतदान झाले. यामध्ये इंडिया आघाडीला यश मिळतेय, हे समोर येत आहे. केंद्र सरकारवर जनतेची नाराजी असल्यामुळे ७६ लाख लोकांनी मतदान केले नाही. ग्रामीण भागात व तरुणांमध्ये मोदी सरकारबद्दल रोष आहे. भाजपच्या पायाखालची वाळू घसरत असल्याने ते समाजामध्ये वाद निर्माण करण्याचे काम करत आहे. पंतप्रधान देशाचे असताना ते हिंदु मुस्लिम यांच्यात तेढ निर्माण करत आहेत. आमच्या जाहीर नाम्यावर मुस्लिम लीगची छाप आहे, अशी टिका पंतप्रधानांनी करणे दुर्दैवी आहे. आमच्या जाहीर नाम्यामध्ये मुस्लिमांबद्दल कुठेही उल्लेख नाही. त्यांच्या या विधानाने आमच्या न्याय पत्राला (जाहीरनाम्याला) प्रसिद्धी मिळाली. पहिल्या टप्प्यात विदर्भातील सर्व पाच जागा इंडिया आघाडी जिंकणार आहे. संपूर्ण राज्यात व देशात काँग्रेस व इंडिया आघाडीला चांगले दिवस आहेत. शेतकऱ्यांना लागणाऱ्या प्रत्येक बाबींची किंमतीत वाढझालेली आहे. शेतमालास भाव नाही, त्यामुळे शेतकरी त्रस्त आहे. देशातील संस्था विकण्याचा धडाका सुरू आहे. देशात महिला सुरक्षित नाहीत, याचे परिणाम या निवडणुकीत दिसतील. आघाडीमध्ये सर्वत्र एकोप्याचे चित्र आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील आघाडीचे चारही उमेदवार चांगल्या मताने निवडून येतील.

काँग्रेसने न्याय पत्र म्हणून आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. मोदी यांच्या सत्ताकाळात ३० लाख नोकऱ्या थांबल्या आहेत. इंडिया आघाडीचे सरकार आल्यावर सहा महिन्यातच या नोकऱ्यांची भरती केली जाईल. आमच्या न्याय पत्रातशेतकऱ्यांचीकर्जमाफी करू,स्वामीनाथन समितीच्या सिफारशि स्विकारू, महिलांसाठी महालक्ष्मीयोजने अंतर्गत महिलेच्या खात्यात दर वर्षी एक लाख रूपये, आरोग्यासाठी २५ लाख रुपये, आदींचा उल्लेख न्यायपत्रात आहे. हा जाहीरनामा अतिशय चांगला आहे. भाजपने आश्वासने दिली पण ती पाळली नाहीत, त्यामुळे भाजपची चारशे पारची घोषणा पोकळ असून ते २०० सुद्धा पार करणार नाहीत. भाजपच्या जाहीरनाम्यावर लोकांचा विश्वास नाही. त्यांनी दिलेली गॅरंटी फसवी आहे, हे लोकांच्या लक्षात आले आहे. जाहीरनाम्यातील तरतुदी काँग्रेस पक्षाच्या सरकारने कर्नाटक, तेलंगणा येथे पूर्ण केल्या आहेत, असेही ठाकरे म्हणाले.

काँग्रेस सत्तेवर आल्यास देशातील महिलांचे मंगळसूत्र राहणार नाही, हे नरेंद्र मोदी यांचे मत त्यांचा तोल सुटल्याचे द्योतक आहे. वरीष्ठ पद भुषविणाऱ्या व्यक्तीने असे बोलणे दुर्दैवी असून त्यांच्या पायाखालची वाळू घसरत आहे, असेहीते म्हणाले.

प्रारंभी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी माणिकराव ठाकरे यांचे स्वागत केले. राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी प्रास्ताविक केले.

■ **दोन पक्ष फोडल्याचे परिणाम दिसतील**

फडणवीस व भाजपने सुड उगवून शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फोडले. पवार साहेबांच्या पुण्यास मोदीशहांनी मदत करून पक्ष व चिन्ह काढून घेणे, षडयंत्र रचणे लोकांना पटलेलं नाही. षडयंत्र करणारे कोण आहेत, माहिती आहे. अजित पवार व एकनाथ शिंदे केवळ मोहरे आहेत. उमेदवार बदलले, स्वाभिमान शिल्लक राहिला नाही. अजित पवारांना चार उमेदवार दिले त्यातही दोन उमेदवार भाजपने दिले.

■ **आघाडीसाठी काँग्रेसनेच पुढाकार घेतला**

देशातील परिस्थिती पाहून काँग्रेसने पुढाकार घेवून आघाडी केली. त्यामुळे आघाडीत कमी जास्त होऊ शकते. सर्वांना सोबत घेवून जाण्याची काँग्रेसची भूमीका आहे. शिवसेना व काँग्रेस नेते एकत्र बसुन सांगली बाबत निर्णय घेतील. शिस्तीच्या बाहेर कोण जाणार नाही, असेही ते म्हणाले.

# हैदराबादमध्ये असदुद्दीन ओवेसींविरोधात काँग्रेसचा मुस्लिम उमेदवार; इंडिया ला होणार फायदा?

**राजदंड न्युज नेटवर्क**

खासदार असदुद्दीन ओवेसीयांचा बालेकिल्ला असलेल्या हैदराबाद लोकसभा मतदारसंघासाठीकाँग्रेसनेआपला उमेदवार जाहीर केला आहे. पक्षाने मोहम्मद वलीउल्लाह समीर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. बुधवारी (२४ एप्रिल २०२४) पक्षाने वलीउल्लाह समीर यांच्या नावाची घोषणा केली. वलीउल्लाह समीर सध्या हैदराबादकाँग्रेसचेअध्यक्ष आहेत.- ऊत्एठढखडएचएछ्ढहैदराबादसोबतच काँग्रेसने करीमनगर मतदारसंघातून वलीचला राजेंद्र राव आणि खमाम मतदारसंघातूनरामसहयाम रघुराम रेड्डी यांना उमेदवारी जाहीर केली आहे.हैदराबादमध्ये ओवेसींचे वर्चस्वहैदराबाद लोकसभा मतदारसंघ हा दक्षिण भारतातील हॉट सीटपैकी एक आहे. सध्या तेथेऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन(-खचखच्)चेअसदुद्दीन ओवेसीखासदार आहेत. मागील अनेक दशकांपासून हैदराबादमध्ये ओवेसी घराण्याची सत्ता आहे. असदुद्दीन ओवेसी यांनी २००४ ते २०१९ पर्यंत, सलग चार वेळा ही जागा जिंकली आहे. यापूर्वी त्यांचे वडील सहावेळा तेथून खासदार होते.

**हैद्राबादमध्ये तिहेरी लढत...**

**या जागेवर ओवेसी यांच्या विरोधात भारतीय जनता पक्षाने (भाजप) फायरब्रँड नेत्या माधवी लता यांना उमेदवारी जाहीर केली आहे. हैदराबादमध्ये मुस्लिम मतदारांची संख्या जास्त असल्यामुळे असदुद्दीन ओवेसींचा पराभव करणे सोपी बाब नाही. आता काँग्रेसने मुस्लिम उमेदवार दिल्यामुळे त्याचा फायदा भाजपला होण्याची शक्यता आहे. मुस्लिम मतांमध्ये फूट पडल्यामुळे ओवेसींची मते कमी होऊ शकतात.**

**हैदराबादमध्ये चौथ्या टप्प्यात मतदान**

**हैदराबादमध्ये चौथ्या टप्प्यात १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे, तर निकाल ४ जून २०२४ रोजी जाहीर होईल.**

# अमेरिकेचे नागरिकत्व घेण्यात भारत दुसरा, २०२२ मध्ये ६६ हजार लोक बनले अमेरिकन, पहिला नंबर कोणाचा?

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे नागरिकत्व मिळवणाऱ्यांत भारतीयांचा क्रमांक दुसरा असल्याचे समोर आहे. सन २०२२मध्ये एकूण ६५ हजार ९६० भारतीयांना अधिकृतरीत्या अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले असल्याचे काँग्रेस सभागृहाच्या ताज्या अहवालात समोर आले आहे.

अमेरिकेच्या जनगणना विभागाने केलेल्या अमेरिकी समुदाय सर्वेक्षण माहितीनुसार, सन २०२२मध्ये एकूण चार कोटी ६० लाख परदेशी नागरिक अमेरिकेत वास्तव्याला. ही संख्या अमेरिकेच्या ३३ कोटी ३० लाख लोकसंख्येच्या १४ टक्के. यापैकी तब्बल ५३ टक्के म्हणजेच दोन कोटी ४५ लाख नागरिकांची नैसर्गिक नागरिक म्हणून नोंद.

१५ एप्रिल रोजी जाहीर झालेल्या ‘अमेरिका नॅचरलायझेशन पॉलिसी’ अहवालात, स्वतंत्र ‘काँग्रेस संशोधन सेवे’ने (काँग्रेसेशनल रिसर्च सर्व्हिस) दिलेल्या माहितीनुसार आर्थिक वर्ष २०२२मध्ये एकूण नऊ लाख ६९ हजार ३८० नागरिकांना मिळाले अमेरिकेचे



नागरिकत्व.

अमेरिकेचे नागरिकत्व मिळवणाऱ्यांत सर्वाधिक संख्या मेक्सिकोच्या नागरिकांची. मेक्सिकोच्या सर्वाधिक एक लाख २८ हजार ८७८ नागरिकांनी मिळवले अमेरिकेचे नागरिकत्व. त्यापाठोपाठ भारत (६५, ९६०), फिलिपाइन्स (५३,४१३), क्युबा (४६,९१३), डॉमिनिकन रिपब्लिक (३४,५२५), व्हिएतनाम (३३,२४६) आणि चीनचा (२७,०३८) क्रमांक.

**सन २०२३च्या सीआरएस अहवालानुसार**

- अन्य देशांत जन्मलेल्या अमेरिकी नागरिकांपैकी सुमारे २८ लाख ३१ हजार ३३० नागरिक भारतातील. - अमेरिकेत सर्वाधिक एक कोटी सहा लाख ३८ हजार ४२९ नागरिक मेक्सिकोत जन्मलेले. त्यापाठोपाठ चीनचा (दोन कोटी २२ लाख पाच हजार ४४७) क्रमांक.

- भारतात जन्मलेल्या व अमेरिकेत राहणाऱ्या नागरिकांपैकी तब्बल ४२ टक्के नागरिक सध्या अमेरिकेचे नागरिक होण्यास अपात्र.

- सन २०२३पर्यंत भारतात जन्मलेले अन् ग्रीन कार्ड किंवा लीगल परमनंट रेसिडन्सी (एलपीआर) मिळवलेले दोन लाख ९० हजार नागरिक अधिकृत नागरिकत्वासाठी पात्र.

प्रलंबित नागरिकत्व अर्जांचा निपटारा

नागरिकत्वाचे अर्ज प्रलंबित राहात असल्याबाबत चिंता व्यक्त केल्यानंतर नागरिकत्वाची प्रक्रिया पूर्ण करणाऱ्या ‘यूएससीआयएस’ने प्रलंबित अर्जांची संख्या अर्ध्याहून कमी केली. आर्थिक वर्ष २०२३च्या अखेरपर्यंत यूएससीआयएसकडे नागरिकत्वाचे सुमारे चार लाख आठ हजार अर्ज प्रलंबित. आर्थिक वर्ष २०२२पर्यंत ही संख्या साडेपाच लाख होती. तर, सन २०२१पर्यंत हीच संख्या आठ लाख ४०हजार व २०२०पर्यंत नऊ लाख ४३ हजार होती. आर्थिक वर्ष २०२३मध्ये ‘एलपीआर’ असणाऱ्या आठ लाख २३ हजार ७०२ नागरिकांचा नागरिकत्वासाठी अर्ज.

मला परभणीकर नोट आणि वोट दोन्ही देत आहेत, मी साडेतीन लाख मतांनी निवडून येणार : महादेव जानकर

नैसर्गिक नागरिकत्व मिळवणाऱ्या हुंडारूस, ब्राझिल मागे

नैसर्गिक नागरिकत्व मिळवणाऱ्यांत हुंडारूस, ग्वाटेमाला, व्हेनेझुएला, मेक्सिको, एल साल्वाडोर आणि ब्राझिलमधील स्थलांतरितांचे प्रमाण सर्वांत कमी. तर, असे नागरिकत्व मिळवणाऱ्यांत व्हिएतनाम, फिलीपिन्स, रशिया, जमैका आणि पाकिस्तानमधील स्थलांतरितांचे प्रमाण सर्वाधिक.

**निकष पूर्ण करणे महत्त्वाचे**

नैसर्गिक नागरिकत्वासाठी पात्र होण्याकरिता अर्जदाराने ‘इमिग्रेशन अँड नॅशनॅलिटी ॲक्ट’ (आयएनए) मध्ये नमूद केलेले काही निकष पूर्ण करणे आवश्यक. त्यात सर्वसाधारणपणे ती व्यक्ती किमान पाच वर्षांसाठी कायदेशीर स्थायी निवासी (एलपीआर) असणे आवश्यक.

# सॅम पित्रोदांच्या वारसा हक्क करावरील वक्तव्यानंतर काँग्रेसची सारवासारव

**राजदंड न्युज नेटवर्क :** काँग्रेस नेते सॅम पित्रोदा यांच्या वारसा हक्कावरील कर या मुद्द्यावरील वक्तव्यानंतर ऐन निवडणुकीच्या काळात नवीन राजकीय वाद सुरू झाला आहे.

मुलाखतीत त्यांनी अमेरिकेतील वारसा हक्काविषयी चर्चा केली. त्यानंतर भाजपने काँग्रेसविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

दरम्यान, इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांच्या वारसा टॅक्स मुद्द्यावरील वक्तव्यापासून काँग्रेस पक्षाने स्वतःला दूर ठेवलं आहे.



सॅम पित्रोदा म्हणाले, अमेरिकेत वारसा टॅक्स कायद्याची व्यवस्था आहे. याचा अर्थ असा की, जर एखाद्या व्यक्तीकडे १०० दशलक्ष डॉलर्सची मालमत्ता असेल, तर त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांना केवळ ४५ टक्के संपत्ती मिळेल. आणि उर्वरित ५५ टक्के सरकार घेईल.

ते पुढं म्हणाले, तुम्ही भारतात हे करू शकत नाही. जर एखाद्याची संपत्ती १० अब्ज रुपये असेल आणि ती व्यक्ती हयात नसेल, तर त्यांची मुलं संपूर्ण १० अब्ज रुपये ठेवतात आणि जनतेला काहीच मिळत नाही. या गोष्टीवर लोकांनी चर्चा केली पाहिजे.

**भाजपची काँग्रेसवर जोरदार टीका**

सॅम पित्रोदा यांच्या वक्तव्यानंतर भाजपने त्यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, सॅम पित्रोदा यांच्या विधानाने संपूर्ण देशाला स्पष्ट केलंय की, काँग्रेसचं सरकार आलं तर खाजगी मालमत्तेचं सर्वेक्षण करून ती संपत्ती सरकारी तिजोरीत टाकली जाऊ शकते.

भाजपचे प्रवक्ते अमित मालवीय यांनीही ट्विट करत, काँग्रेसने भारताला नष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे, असं म्हटलं आहे.

सॅम पित्रोदा यांच्या म्हणण्यानुसार, तुमच्या मेहनतीने जे काही कमावले आहे ते ५० टक्के काढून घेतले जाईल. काँग्रेस सत्तेत आली तर तुम्ही कितीही कर भरला तरी शेवटी तुमची ५० टक्के संपत्ती सरकार घेणार.

काँग्रेस पक्षाची सारवासारव

सॅम पित्रोदा यांच्या वक्तव्यावरून वाद वाढल्यानंतर काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी प्रतिक्रिया दिली.

ते म्हणाले, पित्रोदा अनेक मुद्द्यांवर मोकळेपणाने मत व्यक्त करतात. अर्थात लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला त्यांचे वैयक्तिक विचार व्यक्त करण्याचे आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य असते. याचा अर्थ असा नाही की पित्रोदा यांचे विचार नेहमीच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची भूमिका दर्शवतात. बऱ्याचदा असं घडत नाही. भाजपकडून लोकांचं लक्ष वळवण्याचासाठीचा हा मुद्दाम प्रयत्न केला जातोय.



# अमेरिका इस्त्रायल आणि युक्रेनला देणार अब्जावधी डॉलर्स

**राजदंड न्युज नेटवर्क :** अमेरिकेन सीनेटने युक्रेन, इस्त्रायल आणि तैवानला ९५ अब्ज डॉलर्स ( अंदाजे ७९१५ कोटी रुपये) इतक्या रकमेचे पॅकेज देण्याची मंजुरी दिली आहे.

राष्ट्रपती जो बायडन यांनी बुधवारी या प्रस्तावावर स्वाक्षरी केली. या प्रस्तावानुसार युक्रेनसाठी ६१ अब्ज डॉलरची मंजुरी देण्यात आली आहे.

अमेरिकेनी म्हटले आहे की युद्धग्रस्त युक्रेनला ही मदत काहीच दिवसानंतर मिळणे सुरू होणार आहे. या तिन्ही देशांना पॅकेज देण्याच्या प्रस्तावाच्या बाजूने ७९ मतं पडली तर विरोधात १८ पडली.

या पॅकेजची स्तुती करताना बायडन म्हणाले की हा प्रस्ताव महत्त्वपूर्ण आहे आणि आपल्या देशाला तसेच जगाला पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षिततेची भावना यामुळे मिळेल.

आम्ही आमच्या मित्र राष्ट्रांची मदत करत आहोत जे राष्ट्र हमाससारख्या कट्टरतावाद्यांविरोधात असो वा पुतिनसारख्या हुकूमशाहांविरोधात लढताना स्वतःला वाचवण्याची पराकाष्ठा करत आहेत.

या पॅकेजमधील २६ अब्ज डॉलर ही इस्त्रायलच्या सैन्याला मदत म्हणून देण्यात येणार आहे तर ९.१ अब्ज डॉलर गाझातील युद्धग्रस्तांना मदत म्हणून देण्यात येणार आहे.

# बाबा रामदेव यांची पुन्हा एकदा जाहीर माफी

## माफीनाम्याच्या आकारावरून सुप्रीम कोर्टाचा दणका

**राजदंड न्युज नेटवर्क :** सुप्रीम कोर्टाने जुन्या माफीनाम्याच्या आकारावरून फटकराल्यानंतर बाबा रामदेव यांच्याकडून पुन्हा एकदा जाहीर माफी मागण्यात आली आहे.

पतंजली आयुर्वेद यांच्याकडून याआधी वर्तमानपत्रातील एका कोपऱ्यातील लहान जागेत जाहीर माफीनामा प्रसिद्ध करण्यात आला होता.

पण, तुमच्या जाहिरातीएवढा हा माफीनामा का नाहीये, असा प्रश्न सुप्रीम कोर्टाने बाबा रामदेव यांना विचारला. तेव्हा मात्र बुधवारी (२४ एप्रिल) पतंजलीकडून वर्तमानपत्रात पुन्हा एकदा तुलनेने मोठा आकाराचा जाहीरनामा छापण्यात आला आहे.

बाबा रामदेव आणि पतंजलीचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी ही माफी मागितली आहे.



या माफीनाम्यात असं लिहिण्यात आलं आहे की, आम्ही वैयक्तिकरित्या तसेच कंपनीच्यावतीने प्रलंबित असलेल्या खटल्याच्या संदर्भात माननीय सुप्रीम कोर्टाच्या सूचना/आदेशांचे पालन न केल्याबद्दल बिनशर्त दिलगिरी व्यक्त करतोय. तसंच आम्ही नोव्हेंबर २०२३ रोजी पत्रकार परिषद आयोजित केल्याबद्दल पण माफी मागत आहोत.

आमच्या जाहिरातींच्या प्रकाशनात झालेल्या त्रुटीबद्दल मनापासून दिलगीर आहोत आणि अशा चुका पुन्हा होणार नाहीत याची आम्ही वचनबद्ध आहोत. आम्ही माननीय सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे यापुढे अत्यंत काळजीपूर्वक आणि निष्ठेने पालन करू.

मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने पतंजली आणि रामदेव यांच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांना वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेले माफीनामा पत्र कापून ते सुप्रीम कोर्टात सादर करण्यास सांगितले होते.

तेव्हा कोर्टाने म्हटलं की, आम्हाला माफीनाम्याचा खरा आकार पाहायचा आहे. या आमच्या सूचना आहेत. आम्ही तो पाहिल्यावर त्यासाठी मायक्रोस्कोपचा वापर करयाची गरज भासू नये, असं आम्हाला वाटतं. पतंजली आयुर्वेदने सोमवारी ६७ वर्तमानपत्रांमध्ये माफीनामा पत्र प्रकाशित केला होता. पण त्याचा आकार लहान असल्याने सुप्रीम कोर्टाने त्यांना पुन्हा फटकारलं.

# जूनपर्यंत चिंबल उड्डाण पुलाची एक बाजू पूर्ण होणार

## आमदार रुदाल्फ फर्नांडिस यांची माहिती

**राजदंड न्युज नेटवर्क** : पणजी: चिंबल येथील जंक्शनवरील उड्डाण पुलाचे काम सुरु असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. येत्या जूनपर्यंत उड्डाण पूलाची एक बाजू पूर्ण होणार, असे सांताक्रूझचे आमदार रुदाल्फ फर्नांडिस यांनी सांगितले.



यावर्षी ओल्डगोवायेथे होणाऱ्या शवप्रदर्शनात पोप फ्रान्सिस गोव्यात येत असल्याने सांताक्रूझहून ओल्डगोवाजाणारे सर्वच रस्ते सुरळीत केले जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.सध्या विविध ठिकाणी विकासकामे सुरु असल्याने खोदकामे सुरु आहे. सांताक्रुझ मतदार संघात विविध ठिकाणी कामे सुरु आहे. चिंबल उड्डाण पुलाचे काम जोरात सुरु आहे. येत्या जूनपर्यंत त्याचा एक भाग पूर्ण होणार असून यामुळे काही प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होणार आहे. तसेच इतर सर्व सांताक्रुझ मतदार संघाच्या रस्त्याचे डांबरीकरण इतर विकासाची आहे.आमदार रुदाल्फ म्हणाले, सध्या सांताक्रुझ मतदार संघात विविध कल्वर्टची कामे सुरु आहेत.

जवळपास ३.५ कोटी खर्च करुन दोन कल्वर्टची बांधकामे केली जात आहे. आणखी ३ कल्वर्ट बांधले जाणार आहेत. जर हे कल्वर्ट बांधले नाहीतर पावसाचे पाणी आमच्या शेतजमनीत साठून शेताची नाशाडी होणार आहे.

# जपानचे स्लिम लँडर तिसऱ्यांदा जागृत



**टोकियो :** जपानने चंद्रावर पाठविलेल्या ‘स्लिम’ (स्मार्ट लँडर फॉर इन्व्हेस्टिंग मून) या लँडरने पुन्हा एकदा आश्चर्याचा धक्का दिला आहे. चंद्रावरील रात्रीतील निद्रितावस्थेतून ते तिसऱ्यांदा जागृत झाले आहे. जपानची अवकाश संशोधन संस्था (जाक्सा)ने बुधवारी हा माहिती दिली.

‘स्लिम’ने काढलेले छायाचित्र मिळाल्यानंतर आणि पृथ्वीवरून पाठविलेल्या सिग्नलला त्याने प्रतिसाद दिल्याने ते पुन्हा एकदा जागृत झाल्याची पुष्टी मिळाल्याचे ‘जाक्सा’ने सांगितले. संस्थेने बुधवारी ‘एक्स’वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे, की २३ एप्रिलला ‘स्लिम’शी पुन्हा एकदा संपर्क साधण्यास आम्हाला यश आले आहे. ते तिसऱ्यांदा जागृत झाले आहे. ‘स्लिम’च्य नेव्हिगेशन कॅमेऱ्याने रात्री चंद्राच्या पृष्ठभागाचे छायाचित्र काढले आहे. यात चंद्रावर प्रकाश जास्त आणि अंधार कमी दिसत आहे. जपानचे चांद्रयान २० जानेवारीला चंद्रावर उतरले होते.

# लोकप्रिय कार्टूनचा ‘बाप’ माणूस! ज्याने मिळवले सर्वात जास्त ऑस्कर पुरस्कार

‘**मुंबई** : जगातील फिल्म इंडस्ट्रीतील सर्वात महत्वाचा मानला जाणारा पुरस्कार म्हणजे ऑस्कर पुरस्कार. भले भले सेलेब्रेटी हा पुरस्कार मिळावा म्हणून जीवाचे रान करतात. जीव ओतून काम करतात तरीही त्यांच्या नशिबी हा पुरस्कार नसतो. ऑस्कर पुरस्कारांचे फक्त नामांकन मिळणे ही सुद्धा एक मोठी प्रतिष्ठेची बाब मानली जाते. तितके जरी मिळाले तरी लोक खूष होतात. नामांकन मिळाले आणि पुरस्कार मिळाला नाही तरीही हे कलाकार खुश असतात. परंतु, याच फिल्म इंडस्ट्रीत एका असाही महान कलाकार होता. ज्याने एक दोन नव्हे तर तब्बल २२ ऑस्कर पुरस्कारावर आपले नाव कोरले. शिवाय त्या कलाकाराचे ५९ पुरस्कारांसाठी नामांकन झाले होते. १९३२ साली त्या महान कलाकाराला




सर्वोत्कृष्ट लघू विषयातील (कार्टून) पुरस्कारासोबत तब्बल चार ऑस्कर पुरस्कार मिळाले होते. हा कलाकार म्हणजेच ‘मिकी माऊस’ या जगभरात लोकप्रिय झालेल्या कार्टूनचा निर्माता, लेखक वॉल्ट डिस्ने कधी काळी व्हॅक्युम क्लीनर विकणारा ते जगातील सर्वात जास्त ऑस्कर मिळविणारा कलाकार हा त्याचा प्रवास काही सहजासहजी घडलेला नाही. याच ऑस्कर विजेत्या वॉल्ट डिस्ने याची ही चित्त थरारक कहाणी

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकामधील तीन दशलक्ष या सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या शिकागो शहरात ५ डिसेंबर १९०१ रोजी वॉल्ट डिस्ने यांचा जन्म झाला. बंदर, व्यावसायिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक केंद्र यासाठी हे शहर प्रसिध्द. याच शहरात एलियास डिस्ने आपली पत्नी फ्लॉरा काल हिच्यासोबत रहात होता. या दाम्पत्याला एकूण पाच मुले झाली. एलियास डिस्ने हे शेतीकाम आणि जोडीला सुतार काम करून कुटुंबाचे पोट भरत होता. वॉल्ट डिस्ने चार वर्षाचे असताना वडिलांनी मर्सिलीन येथे जाण्याचा निर्णय घेतला. मर्सिलीन जवळील मिसौरी येथील एका शेतात त्यांनी आपले बस्तान बांधले. परंतु, येथेही त्यांना फार काळ काढता आला नाही. त्यामुळे शेत विकून ते कानस शहरामध्ये स्थायिक झाले. उदरनिर्वाह चालविण्यासाठी त्यांच्या वडिलांनी वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय सुरु केला. लहान मुलांची त्यांना मदत होत होती. परंतु, सात वर्षातच त्यांनी हा व्यवसाय बंद केला आणि पुन्हा एकदा शिकागोची वाट धरली.

व्यवसायात कटू अनुभव आल्यानंतर एलियास डिस्ने यांनी जेली, फ्रूट ज्यूस बनविणाऱ्या कंपनीत नोकरी धरली. वॉल्ट आता १६ वर्षाचा झाला होता. त्याचे शिक्षणात लक्ष नव्हते त्यामुळे त्याने शाळेला राम राम केला. शिक्षणात लक्ष नसले तरी चित्रकला हा त्याचा आवडता विषय होता. अमेरिका पहिल्या महायुद्धात उतरली होती. रेड क्रॉसमध्ये सामील होण्याचे आवाहन अमेरिकन सरकारने केले होते. मात्र, रेड क्रॉसमध्ये सामील होण्यासाठी वय १७ वर्ष पूर्ण असावे अशी अट होती. पण, वॉल्ट डिस्ने याने बनावट जन्मदाखल्याच्या आधारे रेडक्रॉसमध्ये प्रवेश मिळविला. युद्धबंदी झाली आणि १९१९ मध्ये त्यांनी नोकरी सोडली.

**व्हॅक्युम क्लीनर विकायला सुरवात**

रेडक्रॉस सोडल्यानंतर वॉल्ट डिस्ने याने कार्टुनिस्ट होण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेतील कानस शहरात त्यांना मासिक, वृत्तपत्र, चित्रपट याच्या जाहिरातीचे काम मिळाले. याच काळात ऍनिमेशन हे नवीन तंत्र उदयास येत होते. त्याचवेळी त्यांनी एडविन जी लुत्ज यांचे ॲनिमेटेड कार्टून्स हे पुस्तक वाचले. ॲनिमेशन या क्षेत्रातच आपले करिअर करण्याचा निर्णय घेतला. ॲनिमेशनचा अभ्यास सुरु केला. आपल्या विचारांच्या बळावर त्यांनी ‘लाफ-ओ-ग्राम’ नावाचा स्टुडिओ सुरु केला. या पहिल्या प्रयत्नात त्यांना खोप मोठा तोटा सहन करावा लागला. त्यामुळे त्यांनी तो स्टुडिओ बंद करून मोठ्या भावासोबत घरोघरी जाऊन व्हॅक्युम क्लीनर विकायला सुरवात केली. पण, त्या व्यवसायात त्यांच्यामधील कलाकार त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यामुळे त्यांनी पुन्हा डिस्नी ब्रदर्स स्टुडिओची स्थापना केली.

**मित्राने धोका दिला आणि**

डिस्नी ब्रदर्स स्टुडिओमध्ये त्यांचा मोठा भाऊही त्यांच्यासोबत होता. या स्टुडिओत ते छोट्या फिल्म आणि निरनिराळे ॲनिमेटेड कार्टून तयार करत. १९२७ मध्ये वॉल्ट डिस्ने याला एक मोठा धक्का बसला. वॉल्ट याने एक कार्टून तयार केले. ‘द लकी रॅबिट’ ( जीुरश्रव ींहश र्डीलज्ञू ठरललळीं) असे नाव त्याने त्या कार्टूनला दिले. हे कार्टून खूप गाजले. पण, एका मित्राने त्यांची फसवणूक करून त्याचे अधिकार आपल्याकडे घेतले.